


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २९९ ■ शनिवार, दि. ९ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

### दोषींवर कारवाई होणार का ?

दहावीचा निकाल हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. अशा संवेदनशील विषयात एवढा मोठा सावळा गोंधळ उघड झाल्यानंतर आता याला जबाबदार कोण? कोणावर कारवाई होणार? की दरवेळेप्रमाणे तांत्रिक चुकीचे कारण देऊन दोषींना पाठीशी घातले जाणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिक्षण विभागाच्या या ढिसाळ नियोजनामुळे अकोल्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण झाले असून, तातडीने कोऱ्या मार्क लिस्ट मध्ये मार्क टाकून त्या अपलोड कराव्यात अशी मागणी समोर येत आहे.

## टॉपर विद्यार्थ्यांसोबत शिक्षण विभागाचा खेळखंडोबा....

# दहावीच्या विद्यार्थ्यांसोबत 'खेल होबे'

## कोऱ्या मार्कशीटमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला !



प्रतिनिधी ९ मे

**अकोला:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा दहावीचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. मात्र, या निकालाच्या आनंदावर शिक्षण विभागाच्या सावळ्या गोंधळामुळे विरजण पडले आहे. विशेषतः अकोला जिल्ह्यातील अनेक टॉपर विद्यार्थ्यांसोबत शिक्षण विभागाने चक्क 'खेळ होबे' केल्याचा प्रकार समोर आला आहे.

अनेक गुणवंत विद्यार्थ्यांच्या हातात चक्क कोऱ्या मार्कशीट आल्याने 'आता यावर मार्क कोण टाकणार?' असा संतप्त सवाल विचारला जात आहे. या सावळ्या गोंधळ प्रकरणात कोणावर जबाबदारी निश्चित केली जाते आणि कारवाई होते हे पाहण्यासारखे असेल.

### पालकांचा संताप आणि माफीची मागणी

शिक्षण विभागाच्या या भोंगळ कारभारामुळे पालकांमध्ये प्रचंड संताप आहे. 'राज्य सरकारने आणि शिक्षण बोर्डाने या हलगर्जीपणाबद्दल तात्काळ विद्यार्थी आणि पालकांची जाहीर माफी मागावी,' अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्यासोबत आणि आयुष्यासोबत खेळण्याचे धाडस कोणी केले, असा सवाल विचारला जात आहे.

### काय आहे नेमका प्रकार?

निकालाच्या दिवशी जिथे पेढे वाटले जातात, तिथे अकोल्यात संतापाचे वातावरण पाहायला मिळाले. वर्षभर कठोर मेहनत करून ९० टक्क्यांहून अधिक गुणांची अपेक्षा असलेल्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन निकालात अनेक विषयांच्या जागी चक्क शून्य किंवा 'कोरी जागा' दिसत आहे. तांत्रिक चुकांमुळे झालेल्या या प्रकारामुळे विद्यार्थ्यांची मोठी फसवणूक झाली असून त्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात आले आहे.
गुणपत्रिकेत मार्क नसल्याचे पाहत एखाद्या विद्यार्थ्याने काही जीवाचे बरे वाईट केले असते तर शिक्षण मंडळाने जबाबदारी घेतली असती काय असा प्रश्न पालक विचारत आहे.

## मन नदीत बुडून दोघांचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी ९ मे



**आलेगाव :** पातूर तालुक्यातील तुलंगा बु. येथील मन नदीच्या पात्रात बुडून दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. या घटनेमुळे तुलंगा व परिसरात शोककळा पसरली आहे.

मृतकांची नावे दिलीप वसंत मुंडे (वय ४०, रा. तुलंगा बु.) व अजाबराव तुकाराम तायडे (वय ५२, रा. चिखलगाव) अशी आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, दोघेही मन नदीच्या पाण्यात बुडाल्याची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत शोधकार्य सुरू केले. मात्र बराच वेळ शोध घेऊनही दोघांचा शोध लागला नाही. त्यानंतर चान्नी पोलीस स्टेशनला घटनेची माहिती देण्यात आली.यानंतर महान येथील मानव सेवा आपत्ती संत गाडगे बाबा आपत्कालीन शोध पथकाला पाचारण करण्यात आले. शोध पथकातील प्रतीक बोरसे, शेखर केवट, हरीश जुमले, ओम ताले, अक्षय धोत्रे आदींनी नदीपात्रात उतरून शोधमोहीम राबविली. सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर सायंकाळी ७ वाजेपर्यंत दोन्ही मृतदेह बाहेर काढण्यात पथकाला यश आले.

या शोधकार्यात दिग्रस बु. येथील ओम अनंता ताले, कपिल सारंगधर ताले व अक्षय धोत्रे यांनी विशेष सहकार्य केले.

घटनेची माहिती मिळताच प्रभारी तहसीलदार दिनकर केंद्रे, ग्राम महसूल अधिकारी डी. के. देशमुख, डी. जे. नकाशे, महसूल सेवक कपिल ताले, दीप ताले, चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे, बीट जमादार घुगे, पोलिस पाटील अशोक तायडे, खुशाल तायडे आदी अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

पोलीसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविले असून तपास चान्नी पोलिस करीत आहेत.

## खर्ग बेटाजवळ प्रचंड तेलगळती !

## भारतात इंधन दरवाढीचे ढग गडद

प्रतिनिधी ९ मे

**नवी दिल्ली :** एकिकडे अमेरिका-इराण युद्धामुळे जग तेल संकटात असताना, इराणच्या खर्ग आयलंडजवळ समुद्रामध्ये मोठ्या प्रमाणात तेल गळती झाल्याची माहिती समोर आली आहे. या तेल गळतीचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही, तरी यामुळे तेल पुरवठा अधिक विस्कळीत होऊन जागतिक बाजारात तेलाच्या किंमती अधिक वधारण्याची शक्यता वर्तवली जात असून, सामान्यांच्या खिशाला मोठी कात्री लागण्याची चिन्हे दिसत आहेत.

दरम्यान, ६ ते ८ मे दरम्यान युरोपच्या कोपरनिकस उपग्रह प्रणालीने टिपलेल्या काही फोटोंमध्ये खर्ग बेटाच्या पश्चिम भागात तेलाचा तवंग दिसून आला आहे. तज्ज्ञांच्या मते, ही गळती सुमारे ४५ ते ५० चौरस किलोमीटर क्षेत्रावर पसरली आहे.

### ही तेल गळती जीवसृष्टीसाठीही घातक

खर्ग आयलंड जवळील समुद्रात झालेल्या प्रचंड तेल गळतीचा परिणाम केवळ जागतिक तेल बाजारावरच नाही, तर सागरी जीवसृष्टीसाठीही अत्यंत घातक ठरणार आहे. या भागात मोठ्या प्रमाणावर मासेमारी सुरू असते, ज्यावर तेथील स्थानिक अर्थव्यवस्था अवलंबून आहे. ही तेलगळती लवकरात लवकर रोखली गेली नाही, तर मध्य-पूर्वेतील पर्यावरणाला कधीही भरून न काढता येणाऱ्या भीषण नुकसानीला समोर जावे लागण्याची शक्यताही तज्ज्ञांकडून वर्तवली जात आहे.

डेटा डेस्कचे को-फाउंडर लुईस गोडार्ड यांच्या मते, युद्ध सुरू झाल्यापासूनची ही आतापर्यंतची सर्वात मोठी तेलगळती असू शकते.

## आ. बच्चू कडूंचा थेट मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्र्यांना इशारा !



प्रतिनिधी ९ मे

**नागपूर :** संजय गांधी निराधार योजनतील अडीच हजारांचे अनुदान गेले काही महिने अनियमितपणे मिळत असल्यामुळे नेत्रहीनांनी मुख्यमंत्र्यांचे कार्यालय गाठल्याचे समोर आले. लाडक्या बहिणी खरंच तुमच्या लाडक्या...मात्र निराधार दिव्यांगाना असे विना आधार का सोडले. त्यामुळे दिव्यांगांना तातडीने मानधन अदा करावे, अन्यथा १९ मे रोजी आम्हाला मंत्रालयात आंदोलन करावे लागेल, असा इशारा आ. बच्चू कडून यांनी राज्य सरकारला दिला आहे.

राज्य सरकारकडून पात्र दिव्यांग बांधवांना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत दर महिन्याला अडीच हजार रुपये अनुदान दिले जाते. मात्र राज्यभरातील हजारो दिव्यांगांना फेब्रुवारी महिन्यापासून संजय गांधी निराधार योजनेचे अडीच हजार रुपयांचे त्यांचे हक्काचे अनुदान मिळालेले नाही. फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल असे सलग तीन महिने निराधार दिव्यांगांना अनुदान न मिळाल्यामुळे त्यांच्यासमोर आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या आहे. शिवसेनेचे विधान परिषदेतील आमदार बच्चू कडू यांनी सदर प्रकरणावर राज्य सरकारला इशारा दिला आहे.

बच्चू कडू यांनी ३० एप्रिलला शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करत विधान परिषदेवर निवडून आले होते. मात्र आज बच्चू कडू यांनी दिव्यांगांच्या प्रश्नांवरुन राज्य सरकारला इशारा दिला आहे. बच्चू कडू म्हणाले की, काही नेत्रहीन लोक मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयावर मोर्चा काढून गेले. ही बाब अतिशय वेदनादायी आहे. यासंदर्भात मी सातत्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सचिवांशी पण बोललो. जो जीआर काढला यूटीआय कार्ड मिळत नाही तोपर्यंत पगार देऊ नये. हा चुकीचा निर्णय आहे तो शासन निर्णय रद्द झाला पाहिजे. दोन जीआर काढल्यामुळे ५० टक्के दिव्यांग बांधव मानधनापासून वंचित राहत आहे. ही बाब अतिशय वाईट आहे, असं बच्चू कडू म्हणाले. तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी दखल घ्यावी, अन्यथा दुर्देवाने १९ तारखेला आम्हाला मंत्रालयात आंदोलन करावे लागेल, असा इशारा बच्चू कडू यांनी सरकारला दिला आहे.

## आपुल्याच घरात हाल सोसते मराठी..!

## अमरावती विभागात 11 हजार 625 विद्यार्थी मराठीत नापास

प्रतिनिधी ९ मे



**अकोला :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने नुकताच दहावीचा निकाल जाहीर केला. यंदा अमरावती विभागाचा निकाल ९०.५० टक्के लागला आहे. विभागात एकूण १ लाख २६ हजार ४५७ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १ लाख २४ हजार ९६१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून त्यातील मराठी विषयात १ लाख १३ हजार ३३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर जवळपास ११ हजार ६२५ विद्यार्थी मराठी विषयात नापास झाले आहेत. एकीकडे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळत असून दुसरीकडे आपल्याच्या राज्यात तिची दयनीय अवस्था असल्याचे विरोधाभासी चित्र दहावीच्या निकालीने निदर्शनास येत आहे.

राज्यात मराठी भाषा बारावीपर्यंत सक्तीची करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेऊनही प्रत्यक्ष निकालात मात्र मराठीची पीछेहाट सुरूच असल्याचे चित्र समोर आले आहे. यंदा दहावीच्या परीक्षेत अमरावती विभागात तब्बल ११ हजार ६२५ विद्यार्थी मराठी विषयात नापास झाले आहेत. तर काही विद्यार्थी हे काठावर पास झाले आहेत. साधारण मराठी माध्यमात शिकणाऱ्या मुलांची ही अवस्था मराठी भाषेच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. दरम्यान या निकालानंतर आता शाळांमध्ये मराठी शिकवण्याच्या पद्धतीतही काळानुसार बदल होणे आवश्यक आहे. केवळ पाठांतर आणि उत्तरपत्रिका भरण्यावर भर न देता, भाषेचे उपयोजन आणि गोडी निर्माण करण्यावर शिक्षकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. मराठी विषयाची ही दयनीय स्थिती सुधारण्यासाठी केवळ सक्तीचे कायदे पुरेसे नसून विद्यार्थ्यांमध्ये भाषेबद्दल प्रेम निर्माण होणे ही काळाची गरज बनली आहे.

### मराठी भाषेत माघारीची कारणे

शिक्षण क्षेत्रातील जाणकारांच्या मते, मराठी विषयातील या घसरणीला अनेक घटक कारणीभूत आहेत. आजकाल कॉन्व्हेंट संस्कृती वाढली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा, तसेच त्यांच्या पालकांचा कल इंग्रजीकडे वाढला आहे. यामुळे मराठीचा वापर घरात आणि बाहेर बोलण्यापुरता मर्यादित राहिला आहे. व्याकरणाच्या नियमांचे अज्ञान, ऱ्हस्व-दीर्घ चुका आणि शुद्धलेखनाकडे होणारे दुर्लक्ष यामुळे लेखी परीक्षेत विद्यार्थ्यांचे गुण मोठ्या प्रमाणावर कापले जात आहेत. तसेच, तंत्रज्ञानाच्या युगात अवांतर वाचनाची सवय सुटल्याने विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह कमालीचा घटला आहे.


**CLASSIFIED**

**पाहिजे**

**पार्ट टाईम अँड फुल टाईम जॉब करीता मुले पाहिजेत...!**
१) मार्केटिंगसाठी ३ मुले
(२ व्हिलर, आणि मोबाईल आवश्यक) वेळ ९ ते ५
२) माल पोहचवायला २ मुले
-:संपर्क:-
**आदिराज इंटरप्रासेस**
फ्लॅट नं. ५०७
नमुना गल्ली नं. ४
राजकमल चौक, अमरावती
मो. 7028286766



# ग्राहकांच्या स्वनिर्मित विजेवर कर लावणे कितपत योग्य ?




**भारत वीज निर्मिती क्षमतेमध्ये बऱ्याच अंशी स्वयंपूर्ण आहे, परंतु पूर्णपणे ऊर्जा- स्वतंत्र नाही. भारतात जरी मागणी एवढी पुरेशी वीज निर्माण होत असली तरी, वर्ष २०२५ च्या अखेरीस ५०० गिगावॅट स्थापित क्षमतेचा टप्पा ओलांडून आणि ५० टक्कांपेक्षा जास्त मागणी गैर-जीवाश्म स्त्रोतांमधून पूर्ण करूनही, हे उत्पादन करण्यासाठी भारत आयात केलेल्या कोळसा, तेल आणि तंत्रज्ञानावर अवलंबून आहे. भारत मोठ्या प्रमाणात जीवाश्म इंधनाची आयात करतो. तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के आणि वायूच्या गरजेपैकी ५० टक्के आणि सौर घटकांसाठी भारत परदेशी स्त्रोतांवर अवलंबून आहे. त्यामुळे या परालंबत्वेवर मात करण्यासाठी, नवीकरणीय ऊर्जा, हरित हायड्रोजन आणि इलेक्ट्रिक वाहनांकडे वळून आयातीवरील अवलंबित्व कमी करून, २०४७ पर्यंत संपूर्ण ऊर्जा स्वातंत्र्य मिळवण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे.**

उर्जा स्वातंत्र्य उदिष्टेच्या पुर्तीकडे वाटचाल करताना, भारत सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयामार्फत सौर पॅनलचा अवलंब वाढवण्यासाठी, कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि घरगुती वीज बिले कमी करण्यासाठी सौर पॅनल अनुदानास प्रोत्साहन दिले जात आहे. केंद्र सरकारच्या प्रमुख सौर प्रोत्साहनपर योजना अंतर्गत वर्ष २०२४ ते २०२६ पर्यंत भारतात एक कोटी घरांमध्ये छतावर सौर पॅनल बसवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यासाठी पहिल्या २ किलोवॅटला ३० हजार रुपये प्रति किलोवॅट व ३ किलो वॅटपर्यंत, प्रत्येक अतिरिक्त किलोवॅटसाठी १८ हजार रुपये अनुदान देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यामुळे जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी होईल व तसेच या क्षेत्रात रोजगार निर्मिती होईल.

महाराष्ट्र राज्य सरकारने २०२५-२०३५ या कालावधीत नवीकरणीय ऊर्जा आणि ऊर्जा साठवण धोरणाला मंजुरी दिली असून, २०३५ पर्यंत १०० गिगावॅट नवीकरणीय ऊर्जा क्षमता आणि ६५ टक्के स्वच्छ ऊर्जा खरेदीचे लक्ष्य ठेवले आहे. २०३५ पर्यंत, राज्याची ६५ टक्के वीज अक्षय ऊर्जा स्त्रोतांकडून मिळवण्याचे आणि विजेच्या मागणीपैकी किमान १० टक्के मागणी ऊर्जा साठवण प्रणालींद्वारे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टामध्ये १०० गिगावॅट अक्षय ऊर्जा क्षमता आणि दररोज ताशी १०० गिगावॅट ऊर्जा साठवण क्षमता विकसित करण्याचा समावेश आहे.

घराच्या छतावर सौर प्रणाली लावण्यासाठी खर्च, शासकीय अनुदानामुळे, लक्षणीयरीत्या कमी येतो, वीज बिलात कमी, व सौर प्रणाली साधारणपणे कमीतकमी नियमित देखभालीसह वीस वर्षे किंवा त्याहून अधिक काळ टिकते, त्यामुळे ग्राहक दरवर्षी लक्षणीय दीर्घकालीन बचत करू शकतात. सौर ऊर्जेचा अवलंब केल्याने जीवाश्म इंधनावरील सौर प्रणाली ग्राहकांचे अवलंबित्व कमी होते आणि कार्बन उत्सर्जन कमी होण्यात मदत होते. त्यामुळे महाराष्ट्रातील घरमालक आणि उद्योजक छतावरील सौर पॅनेल हा वीज निर्मितीसाठीचा एक विश्वासार्ह पर्याय म्हणून मोठ्या प्रमाणात स्विकारत आहे.

महाराष्ट्रात आजपर्यंत अपारंपारिक स्त्रोतांद्वारे निर्माण होणाऱ्या सौर विजेवर वीज शुल्क आकारले जात नव्हते. पण आता महाराष्ट्र राज्य छतावरी सौर पॅनल आणि बिहाइंड द मीटर (बीटीएम) वापरकर्त्यांवर विद्युत शुल्क लागण्याच्या तयारीत आहे. छतावरील सौर ऊर्जा वापरणाऱ्या ग्राहकांनी आवश्यकतेपेक्षा अधिक वीज घेतल्यास त्या अतिरिक्त वापरावर शुल्क लागू होत होते. परंतु आता वीज कायद्यानुसार निर्माण होणाऱ्या प्रत्येक विजेवर शुल्क आकारण्याची तरतूद आहे, याचा आधार घेत, महाराष्ट्र शासनाने, आता ग्राहकाने स्वतः गुंतवणूक करून निर्माण केलेल्या सौर ऊर्जेवर, वीज शुल्क आकारणी करण्याचे योजिले आहे व त्याचा अभ्यास करण्यासाठी साठी उच्चस्तरीय समिती नेमली आहे. ही समिती, ग्राहकांनी स्वतः गुंतवणूक करून निर्माण केलेली वीज व ग्रिडला दिलेली वीज यावर किती शुल्क आकारायचे, या नव्या कर आकारणीच्या प्रस्तावाचा अभ्यास करणार आहे. महत्त्वाचे म्हणजे या समितीतील सर्व सदस्य हे शासकीय अधिकारी आहेत व यात एकही ग्राहक किंवा उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी नाही.

वीज वितरण कंपन्यांना, ग्रिडचा वापर 'बॅकअप' म्हणून किंवा विजेच्या देवाणघेवाणीसाठी केल्यास, पायाभूत सुविधांचा खर्च वसूल करण्याचा कायदेशीर अधिकार आहे. अनेक राज्य नियामकांनी वितरण कंपन्यांना छतावरील सौर ऊर्जा वापरणाऱ्या ग्राहकांवर विशेषतः दहा किलो वॅट पेक्षा जास्त क्षमतेच्या प्रणाली असलेल्या ग्राहकांवर ग्रीड सपोर्ट चार्जेस आकारण्याची परवानगी दिली आहे. सौर ऊर्जा निर्मिती उपलब्ध नसताना ग्रिडचा वापर केल्यास त्याची भरपाई करण्यासाठी हे शुल्क आकारले जाते. मध्यप्रदेश सरकारने वीज वितरण कंपनी व्यतिरिक्त इतर ग्राहकांना विकल्या जाणाऱ्या सौर ऊर्जेवर दहा पैसे प्रति किलोवॅट हरित ऊर्जा विकास शुल्क लावले आहे.

केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने सौर, जल किंवा पवन ऊर्जेपासून वीज निर्मितीवर विकास शुल्क किंवा उपकराच्या नावाखाली आकारले जाणारे कोणतेही अतिरिक्त शुल्क किंवा कर हे नवीकरणीय ऊर्जेला प्रोत्साहन देण्याच्या केंद्रीय धोरणाच्या सर्वसाधारणपणे विरोधात आहेत, असे स्पष्ट केले आहे. भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने २५ ऑक्टोबर २०२३ रोजी जारी केलेल्या परिपत्रकात विविध राज्य सरकारांकडून वीज निर्मितीवर (जलविद्युत, नवीकरणीय ऊर्जा, औष्णिक, इत्यादी) आकारण्यात येणाऱ्या अतिरिक्त शुल्क/करांच्या संदर्भात भाष्य करण्यात आले आहे. त्यात वीज निर्मितीवरील 'जल उपकर' किंवा 'विकास शुल्क' यांसारखे राज्यांनी लादलेले कर घटनाबाह्य आहेत, असे नमूद केले आहे. तसेच त्यांनी राज्यांना हे शुल्क मागे घेण्याचा सल्ला पण दिला, कारण त्याने कर आकारणीच्या अधिकारांच्या विभाजनासंबंधीच्या घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन होते, असे पण स्पष्ट केले आहे. जीवाश्म इंधन हे हवामान बदलास कारणीभूत ठरणाऱ्या हरितगृह वायूंचे प्रमुख स्त्रोत आहेत. एकीकडे, जीवाश्म इंधनांपासून दूर जाण्याच्या जागतिक संक्रमणाला गती देण्यासाठी, आणि उर्जा स्वातंत्र्य उदिष्टेच्या पुर्तीकडे वाटचाल करण्यासाठी, भारत सरकार नवीकरणीय ऊर्जेला, विशेषतः सौर ऊर्जेला, प्रोत्साहन आणि अनुदान देत आहे. कर सवलती, अक्षय ऊर्जा प्रोत्साहन दर आणि अनुदान यांसारख्या सरकारी पाठिंब्यामुळे सौर पॅनल लावण्याचा उच्च प्रारंभिक खर्च कमी होतो, ज्यामुळे छतावरील सौर पॅनल लावणे कुटुंबे आणि व्यवसायांसाठी आर्थिकदृष्ट्या सुलभ होते, आणि त्यामुळे लोक सौर पॅनल लावण्याकडे वळत आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्र शासन सौर ऊर्जा निर्मितीवर कर लावण्याचा विचार करत आहे. या दोन्ही बाबी निश्चितच परस्पर विरोधाभासी आहेत. एका बाजूला 'हरित ऊर्जा धोरण' राबवून सौर ऊर्जेला प्रोत्साहन द्यायचे आणि दुसऱ्या बाजूला त्यावर कर लावायचा, यामुळे आत्मनिर्भर ऊर्जा धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संभाव्य करामुळे सौरऊर्जा प्रकल्पांचा परतावा कालावधी वाढेल आणि सौर पॅनल लावण्याकडे ग्राहकांचा ओढा कमी होण्याची भीती आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याने सौर ऊर्जा निर्मितीवर कर आकारणीचा विषय सोडून देणे अधिक रास्त ठरेल.

प्रा.डॉ. संजय खडक्कार
प्रा.डॉ. संजय खडक्कार,
माजी तज्ज्ञ सदस्य, विदर्भ वैधानिक विकास मंडळ. ७२७६६१४२६०

## अल निनोच्या पार्श्वभूमीवर

# जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर पूर्ण करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** अल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण तसेच जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गतची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावीत. तसेच भूजल पातळी कमी झालेल्या ठिकाणी प्राधान्याने कामे करून तेथील भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी मृद व जलसंधारण विभागाचा आढावा घेतला. यावेळी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे जल -विषयक सल्लागार श्रीराम वेदिरे, विशेष कार्य अधिकारी प्रिया खान, मृद व जलसंधारण आयुक्त अंजली रमेश, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय देवराज आदी यावेळी उपस्थित होते.



## भूजल पातळी वाढविण्यासाठी कामे करण्याचे निर्देश


मुख्यमंत्री म्हणाले की, एल निनोच्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी जलसंधारण, जलयुक्त शिवारमधील कामांचे प्राधान्य ठरवून ती पूर्ण करण्यात यावीत. तसेच जलयुक्त शिवार २.० अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये दुरुस्तींच्या कामांची निकड पाहून ही कामे आराखड्यात समाविष्ट करून तातडीने पूर्ण करावीत. जलयुक्तमधील राज्यस्तरीय आराखडे १५ मे पूर्वी मंजूर करण्यात यावेत. तसेच जिल्ह्यांना सुधारित आराखडे देऊन कामांना गती द्यावी. जलयुक्त शिवारची कामे हाती घेतलेल्या गावांबाहेरील १० टक्के कामेही प्राधान्यक्रम ठरवून हाती घेण्यात यावीत.

केंद्र शासनाच्या 'विकसित भारत जी राम जी' योजनेमध्ये जलसंधारणाच्या कामांवर भर देण्यात आला आहे. त्याचा लाभ घेऊन राज्यातील जलसंधारणाची कामे पूर्ण करून घ्यावीत. जलसंधारण कामाअंतर्गत नालाखोलीकरणची कामे करताना त्याठिकाणी पुन्हा गाळ होऊ नये, यासाठी नाल्याच्या ठिकाणी बांबू लागवड करण्याचा विचार करावा. विदर्भातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे जून महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन करावे. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत वाढीव निधी मिळण्यासाठी केंद्रीय मंत्री यांना स्वतः भेटणार असल्याचेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले की, मृद व जलसंधारण विभागाच्या आकृतीबंधाला मंजुरी मिळाल्याने आता कामास गती येईल. आतापर्यंत मंजुरी दिलेली कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच मूळ आराखड्यानुसारच कामे पूर्ण व्हावीत यासाठी मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. मालगुजारी तलावांच्या ठिकाणी असलेली अतिक्रमणे काढण्याची परवानगी मिळावी.

सचिव पापळकर यांनी सांगितले की, जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत विशेष निधी व अभिसरणअंतर्गत आतापर्यंत गाव आराखड्याप्रमाणे १ लाख ४४ हजार ६९७ कामे मंजूर झाली आहेत. त्यापैकी १ लाख १० हजार १२० कामे पूर्ण झाली आहेत. ऊर्वरित कामे प्रगतीपथावर असून लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

एल निनोच्या पार्श्वभूमीवर टँकरग्रस्त आणि भूजल पातळी खालावलेल्या गावांमध्ये प्राधान्याने कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच विविध योजनाअंतर्गत पाणलोट क्षेत्रात झालेल्या मृद व जलसंधारण कामांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी करण्याचे काम सुरू असून आतापर्यंत १५ लाख १५ हजार कामांपैकी १२ लाख २७ हजार संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी झाली आहे. गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अंतर्गत यावर्षी १४३५ जलसाठ्यातून ४७७.७३ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे ३०८३५ सघमी पाणीसाठा पुनर्स्थापित झाला असून ७३ हजार ४१७ एकर क्षेत्र सुपिक झाले आहे. या वर्षी १५ जून पर्यंत जिल्हानिहाय गाळ काढण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत आतापर्यंत २२ हजार कामे पूर्ण झाली असून त्यांचे जिओ टॅगिंग करण्यात आले आहे. तसेच पाणलोट विकास घटकांतर्गत ५७ अमृत सरोवर तयार करण्यात येत असून १५ जूनपर्यंत ३१ अमृत सरोवर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. विभागाच्या पाच वर्षाच्या बृहद आराखड्याअंतर्गत राज्यातील २७ हजार ९४२ सूक्ष्म पाणलोटांमध्ये १ लाख २१ हजार ५८३ कामे प्रस्तावित करण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## दिन विशेष



आज जयंती

**प्रताप सिंह पहिला तथा महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली झाला. ते सिसोदिया घराण्यातील मेवाडचे राजपूत राजा होते. मुघल साम्राज्याच्या विस्तारवादी धोरणाचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी १५७६ मधील हल्दीघाटीच्या लढाईसह अकबराविरुद्ध अनेक मोठ्या लढाया केल्या. गनिमी युद्धाद्वारे त्यांच्या लष्करी प्रतिकारासाठी प्रताप लोकनायक बनले जे नंतर मलिक अंबर आणि शिवाजी महाराजांसह मुघलांच्या विरुद्ध बंडखोरांसाठी प्रेरणादायी ठरले. महाराणा प्रताप हे सिसोदिया कुळातील क्षत्रिय राजपूत राजे होते.**

**महाराणाचे पूर्वज मेवाडचे शासक आणि भगवान राम यांनी उत्पन्न केलेले सूर्यवंशी होते. मेवाडच्या राजघराण्यावर 'बाप्पा रावळ', 'राणा कुंभा' आणि 'राणा सांगा' अशा अनेक राज्यकर्त्यांनी राज्य केले. शक्ती सिंह, विक्रमसिंह आणि जगमल सिंह हे प्रतापांचे लहान बंधू होते. महाराणांचा विवाह बिजोलियाच्या अजबदे पंवार यांच्याशी सन १५५७ ला झाला होता. त्यांचे इतर आणखी १० राजकुमारींशीही लग्न झाले होते जसे की त्या काळात परंपरा होती (राजकीय संबंध) आणि अमरसिंह प्रथम यांच्यासह त्यांना १७ मुले झाली.**

**मेवाडच्या महान राजघराण्याशी त्यांचा संबंध होता. महाराणा प्रताप यांच्या जन्मस्थळाच्या प्रश्नावर दोन गृहीतके आहेत. पहिले गृहीतक हे, महाराणा प्रताप कुंभलगड किल्ल्यात जन्माला आले असे आहे. कारण महाराणा उदयसिंह आणि जयवंताबाई यांचे लग्न कुंभलगड राजवाड्यात पार पडले होते. दुसरा विश्वास असा आहे की, त्यांचा जन्म मारवाडमधील पालीच्या वाड्यांमध्ये झाला. महाराणा प्रतापांच्या आईचे नाव जयवंताबाई होते, त्या पालीच्या सोनगरा अखैराजसिंह यांच्या सुपुत्री होत्या.**

# हिंदूसूर्य महाराणा प्रताप

महाराणा प्रताप यांना लहानपणापासूनच राजवाड्या पेक्षा, सामान्य जनतेबरोबर वेळ घालायला जास्त आवडत असे. त्यांच्या जनतेमध्ये भिल्ल समुदाय जास्त प्रमाणात होता. त्यामुळे अर्थातच त्यांच्या सवंगड्यांमधेही भिल्ल मुले खुप होती. त्यांनी स्वतःबरोबरच आपल्या सवंगड्यांणाही सशत्र युद्धचे धडे दिल. भिल्ल आपल्या मुलाला किका असे संबोधतात. म्हणून ज्येष्ठ भिल्ल, महाराणाला किका नावाने हाक मारत असत. यावरून आपल्याला महाराणा बद्दल सामान्य लोकांच्या मनात किती आदर आणि प्रेम होता हे कळते. लेखक विजय नहार यांच्या 'हिंदुसूर्य महाराणा प्रताप' या पुस्तकानुसार, प्रतापचा जन्म झाला तेव्हा उदयसिंह आणि मेवाड राज्य युद्ध आणि असुरक्षिततेने घेरले होते. कुंभलगड कोणत्याही प्रकारे सुरक्षित नव्हता. त्या काळात जोधपूरचा राजा मालदेव सर्वात शक्तिशाली होता. जयवंतबाई यांचे वडील आणि सोनी यांचा मुलगा सोनागरा अखेरज मालदेव एक समर्थ राजे होते. या कारणास्तव पाली आणि मारवाड सर्वच प्रकारे सुरक्षित होते. म्हणून जयवंताबाईंना पाली येथे पाठविण्यात आले. वि. सं. ज्येष्ठ शुक्ल तृतीया शके १५४० रोजी महाराणा प्रताप यांचा जन्म पाली मारवाड येथे झाला. प्रताप यांच्या जन्माची खबर मिळताच उदयसिंहाच्या सैन्याने मोर्चाला सुरुवात केली आणि मावलीच्या युद्धात बनवीरविरुद्ध विजय मिळवला आणि चित्तोडच्या गादीचा ताबा घेतला. महाराणा प्रताप यांचे मुख्य साहाय्यक, भारतीय प्रशासकीय सेवेचे सेवानिवृत्त अधिकारी देवेंद्रसिंग शक्तिवत यांच्या पुस्तकानुसार, महाराणा प्रताप यांचे जन्मस्थान जुना कचरी पाळीचे अवशेष असलेल्या जुन्ना किल्ल्यात होते. हा किल्ला हे त्यांच्या आईचे घर होते. परंपरेनुसार मुलीचा पहिला मुलगा तिच्या माहेरी जन्मतो. इथे सोनगरचे कुलदेवी नागनाची मंदिर अजूनही सुरक्षित आहे. इ.स. १५६८ मध्ये, उदयसिंह रणवीर आनोसे दुसरे यांच्या चित्तोड राज्यावर मुघल सम्राट अकबर आपल्या ३५००० सैन्यासह चाल करून आला आणि त्याने चित्तौड़ किल्ल्याला वेढा घातला. चार महीने चाललेल्या या प्रदीर्घ वेढ्यामुळे किल्ल्यावरची रसद संपत आली होती. कारण किल्ल्यावर सुमारे ३० हजार सामान्य जनता आश्रित होती व केवळ ८ हजार राजपूत सैनिक होते. या हल्ल्यात राजघराणे सुरक्षित रहावे म्हणून काही प्रमुख सरदारांचा सल्ला ऐकून राणा उदयसिंह आणि मेवाडचे राजघराणे किल्ल्यावर शत्रूला ताबा मिळण्याआधी निसटले. या युद्धात ८ हजार राजपूत वीरांणी शौर्याची प्रचिति देत, अकबराच्या २५ हजार सैनिकांचा फाडशा पाडला व स्वतःही वीरमरण स्वीकारले, याचा बदला म्हनूण अकबरने किल्यावरच्या ३० हजार० निष्पाप लोकांचा बळी घेतला. उदयसिंह यांनी १५५९ मध्ये उदयपूर शहराची स्थापना केली. राणा उदयसिंह आणि त्यांची सर्वात प्रिय राणी भटीयानी यांचा मुलगा जगमल याने त्यांच्या नंतर राज्यकारभार सांभाळावा अशी महाराजा उदयसिंह यांची इच्छा होती, पण राजे उदयसिंह यांच्या मृत्यूनंतर त्यांचा ज्येष्ठ पुत्र प्रताप याने परंपरेनुसार राज्य कारभार सांभाळावा अशी सर्व वरिष्ठ मंत्र्यांची इच्छा होती. प्रताप यांच्या राज्याभिषेकाआधी मुख्यमंत्री चुंदावट आणि तोमर रामशाह यांनी जगमलला राजवाड्याबाहेर घालवून दिले आणि प्रताप यांस मेवाडचा राजा म्हणून घोषित केले. प्रताप यांची त्यांच्या वडिलांच्या इच्छेविरुद्ध राजा होण्याची तयारी नव्हती पण राज्यातील मंत्र्यानी जगमल हा राज्य करण्यास असमर्थ असल्याचे प्रताप यांस पटवून दिले. राजपथावर बसल्यानंतर अतिशय पराक्रमाने आणि कुशलतेने त्यांनी राज्यकारभार चालवला. एक कुशल योद्धा संघटक व राजकारणनिपुण असा राज्यकर्ता म्हणून त्यांनी आपला लौकिक निर्माण केला. १ जून १५७६ रोजी हळदीघाटीची लढाई आमेरच्या मानसिंग (अकबराचा सेनापती) याच्या नेतृत्वात महाराणा पर्तापसिंह आणि अकबरच्या सैन्यामध्ये झाली. लढाईचे ठिकाण राजस्थानमधील आधुनिक काळातील राजसमंद गोगुंडाजवळील हळदीघाटीजवळ एक अरुंद डोंगराळ खिंड होती. प्रतापसिंग यांनी सुमारे ३००० घोडदळ आणि ४०० भिल्ल तिरंदाजीची फौज तयार केली. मोगलांचे नेतृत्व अंबर येथील मानसिंग करीत होते आणि त्याने सैन्यात सुमारे ८५,००० पायदळ, घोडदळ, बंदुकी तोफा होत्या. या हल्दीघाटीच्या युद्धात महाराणा प्रतापांनी मुघलांना सळो की पळो करून सोडले. मानसिंग हा हत्तीवर बसून युद्ध करत होता तर महाराणा आपल्या प्रिय घोडा चेतक वर बसून हातात ८० किलोचा भाला घेऊन युद्ध करत होते. मानसिंगला बघून चेतकने आपले दोन्ही पाय हत्तीच्या मस्तकावर ठेवले एवढ्यात महाराणा आपला भाला फेकायला तेवढयात हत्तीच्या सोंडेला लागलेली तलवारमुळे चेतकचा एक पाय कापला गेला. मुघलांनी लपून महाराणा प्रतापांच्या पायावर दोन, एकाने लपून महाराणांच्या पाठीवर बाण मारला. दोन गोळ्या पायाला लागल्या मुळे महाराणा आणि चेतक प्रचंड घायाळ झाले होते व युद्ध करण्याच्या स्थितीत नव्हते. त्यामुळे त्यांच्या सरदारांनी या हिंदुस्थानाचा स्वामी जिवंत राहावा, भविष्यात जर महाराणा जिवंत राहिले तरच हे अत्याचारी मुघल आपल्या भूमीत पाय रोवू शकत नाही हे त्यांना ठाऊक होते. म्हणून सर्व सरदारांनी जबरदस्तीने महाराणा प्रतापांना हात जोडून साकडे घातले की 'राणाजी, आज जर तुम्ही या युद्धातून सुखरूप गेला नाहीत तर आम्ही न लढताच आमचा शिरच्छेद करून घेऊ. तुमचं जगणं या मेवाडसाठीच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानासाठी आवश्यक आहे तर कृपा करून युद्धभूमीतून आपण निघावं, इथून पूढ़चा मोर्चा आम्ही भक्कमपणे सांभाळू. आतापर्यंत महाराणाच्या जखमांमधुनही खूप रक्तस्त्राव झाला होता, या परीस्थितिमध्ये महाराणा प्रताप यांचं मेवाडमुकुट त्यांच्या एक सरदाराने घेतलं, ज्यांना आपण महाराणा प्रतापांच दुसरं प्रतीरूपही म्हणू शकतो, त्यांचं नाव झाला मानसिंग (दिसण्यात दुसरे महाराणा) त्यांनी महाराणा प्रतापांच मेवाडमुकुट स्वत: परिधान करून म्हणाले, आज तरी एकदिवस महाराणा मला बनू द्या आणि या मोगलांच्या रक्ताने माझ्या तलवारीची तहान भागवू द्या, राणाजी महाराणा म्हणून जन्मलो नसेल तर आज महाराणा म्हणून मरेल याहून मोठी गोष्ट तुमच्या या सेवकाची अजुन काय असेल! असे म्हणून सर्व सरदारांनी महाराणा प्रताप यांना युद्ध भूमीतून पाठवून दिले. चेतक महाराणा प्रतापांना घेऊन जात असताना एक मोठी दरी त्याच्या समोर आली, तरीही तो डगमगला नाही व आपल्या घायाळ स्वामीला घेऊन २८ फूट दरीच्या उंचीवरून चेतकने मोठी उडी घेतली आणि पलीकडच्या बाजूला घेऊन महाराणा प्रतापांना सुखरूप पोहचवले व ताण बसल्यामुळे वीर स्वामी भक्त चेतकचा मृत्यू झाला. महाराणा आयुष्यात कधी रडले होते तर चेतकच्या मृत्यूलाच. १५८२ मध्ये, महाराणा प्रतापने दिवेर येथे मुघल चौकींवर हल्ला चढवला आणि ती ताब्यात घेतली. यामुळे मेवाडमधील मोगल सैन्याच्या सर्व ३६ चौक्या ताब्यात आल्या. या पराभवानंतर अकबरने मेवाडविरुद्धची सैन्य मोहीम थांबवली. दिवेरचा विजय हा प्रतापसाठी एक मुख्य अभिमानाचा विषय होता. इतिहासकार जेम्स टॉडने 'मेवाडचे मॅरेथॉन' असे वर्णन केले आहे.

**अंदाजपत्रकीय दर सुचना (BUDGETORY NOTICE For Rate) क्र. १९५ व १९६/२०२६-२७**

**सदर दर सुचना महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर स्वरुपात प्रसिद्ध करण्यात आली असुन त्यानुसार सदर अंदाजपत्रकीय दर सूचनेतील नमूद बाबींचे दर या कार्यालयास दिनांक २०/०५/२०२६ पर्यंत प्राप्त होतील असे सादर करावेत.**

**(र.दौ. खैरनार)**
**कार्यकारी अभियंता विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग अकोला**

वि.मा.का./अम./जाहि./११०/२०२५-२०२६

सिटी न्यूज अकोला
शनिवार, दि.९ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# शुक्रवारी रात्री वादळी वाऱ्यासह पाऊस पिकांचे नुकसान, वीज पुरवठा खंडित

प्रतिनिधी ९ मे

**अकोला :** जिल्ह्यात शुक्रवारी रात्री वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. काही ठिकाणी झाडे पडली. तसेच केळीसह कांदा आणि अन्य पिकांचे नुकसान झाले. अकोला शहरासह अकोट, हिवरखेड आणि ग्रामीण भागात वीज पुरवठा खंडित झाला होता. अवेळी पावसामुळे काही वेळ हवेत गारवा निर्माण झाला होता. परंतु शनिवारी सकाळ पासून पुन्हा उष्मा जाणवू लागला.



अकोट तालुक्यातील अकोली जहागीर रात्री ११ च्या सुमारास विजांच्या कडकडाटासह जोरदार वारा पाऊस झाला केळीची पाने फाटली. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान आणि कांद्याच्या शेतात पाऊस आल्यामुळे कांदा पण भिजला. अंबाडी, राजुरा कापशी भागातील ज्वारी केळी कांदा पिकाचे नुकसान आणि कुटार कडबा पण ओला झाला.

अकोली परिसरात रात्रभर लाईट बंद होती अनेक तार तुटले व साळपण हवेमुळे कोलमडून पडले आहेत. हिवरखेड भागात देखील चांगला पाऊस झाला. काही दिवसांत तापमान ४२ अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. मात्र, वातावरणात बदल जाणवत आहे.

### हिवरखेड मध्ये रात्री आले वादळ; रात्री व दुपार पर्यंत बत्ती गुल

हिवरखेड येथे शुक्रवारच्या रात्रीला ३च्या दरम्यान अचानक वादळी वारा पाऊस सुरू झाला, यामध्ये अनेक झाडे झुडपे कोसळली, शेतकऱ्यांची ताट पिके झुकली तसेच रस्त्यांवर नाल्या तुडूंब भरल्या यामध्ये महावितरणची बत्ती गोल झाली नागरिकां रात्रभर व सकाळी १२ वाजेपर्यंत वीणा लाईनचे आपले दैनंदिन कामे करावे लागले, दुपारी परत तापमान वाढले.

हिवरखेड भागात नागरी समस्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. पुढे पावसाळा असल्यामुळे नाली सफाई तसेच अन्य विकास कामांना प्राधान्य द्यावे, अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे.

## व्यंकटेश बालाजी स्कूलची १०० टक्के निकालाची परंपरा कायम



प्रतिनिधी ९ मे

**मूर्तिजापूर :** स्थानिक व्यंकटेश बालाजी इंग्लिश हायस्कूलची २२ वर्षापासून ची परंपरा कायम राखत यंदाही दहावीच्या परीक्षेचा निकाल १०० टक्के लागल्याने विद्यार्थ्यांसह पालक वर्ग व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने आनंद व्यक्त करण्यात येत आहे. एस. एस. सी. परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२६ करिता विद्यालयातून १४० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी ४२विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहे तर ११८ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. मागील २२ वर्षापासून १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत असून पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसत आहे. कु गार्गी सचिन माटोडे ही विद्यार्थी ९८.६०%गुण घेऊन शाळेतून प्रथम आली आहे. कु अनुष्का कोल्हे ९७.६०, कु हरीप्रिया तिवारी ९७.२०, कु अमृता मोरे ९७.२०, निर्भय पजई ९६.८०, अथर्व शंकरपुरे ९६.६०,

कु शर्वरी लांडे ९६.६०, कु आदिती कावरे ९६.६०, प्रथमेश पंचबुद्धे ९५.८०, परम शर्मा ९५.४०, चिराग तांबे ९५.२०, नक्षत्रा घाटे ९५.०० या प्रमाणे टक्केवारी प्राप्त करून ९५ टक्के पेक्षा जास्त टक्केवारी मिळवण्याचा बहुमान मिळवलेला आहे. गणित या विषयात कु. गार्गी सचिन माटोडे व कु. शर्वरी लांडे, अथर्व शंकरपुरे यांनी १०० पैकी १०० गुण प्राप्त केलेले आहे. मुंबईचे उद्योजक अशोक लक्ष्मणराव बावनेरकर यांच्यातर्फे मातोश्री अनुसयाबाई लक्ष्मणराव बावनेरकर यांच्या नावाने एस एस सी परीक्षा प्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी एक उपक्रम राबवलेला आहे.

या उपक्रमात दरवर्षी दहावीच्या परीक्षेत प्रथम येण्याचा बहुमान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ११ हजार रुपयांचे रोख बक्षीस देण्यात येईल. यावर्षी तो मान कु. गार्गी सचिन माटोडे या विद्यार्थिनीने मिळवलेला आहे. या सर्वांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष प्रा. अवधूत ज्ञानेश्वर ढेरे, उपाध्यक्ष प्रा. कुमुद ताई दुबे, सचिव राजश्री ढेरे, संचालिका रुपाली अवधूत ढेरे, प्राचार्य सारिका कडू, पर्यवेक्षिका मीनाक्षी महाजन, सहाय्यक शिक्षक सुजित बनसोड, सारिका जळमकर, अमित पोटे, शेख इकबाल, अजय गोस्वामी, अमोल मोंढे, गौरव मुंदे, अमर गवई तथा आपल्या आई-वडिलांना दिले.

### बाल शिवाजीच्या मृणाल पदमनेला ९७.४० टक्के



**अकोला :** जठारपेठ स्थित बाल शिवाजी हायस्कूलची विद्यार्थिनी मृणाल सुनील पदमने हिने दहावीच्या परीक्षेत ९७.४० टक्के गुण मिळवित शाळेतून तृतीय क्रमांक पटकावला. तिला गणित आणि संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. तिने आपल्या यशाचे श्रेय शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक वर्गाला दिले आहे.

### दहावीच्या परीक्षेत सिद्धी जोशी हिला ८२.२० टक्के गुण



**अकोला :** अकोला अर्बन बँकेचे कर्मचारी हरीश जोशी यांची सुकन्या आणि गिरीश जोशी यांची पुतणी सिद्धी जोशी हिला दहावीच्या परीक्षेमध्ये ८२.२० टक्के मार्क मिळाले. मुंगीलाल बाजोरिया कान्व्हेंटची ती विद्यार्थीनी आहे.

### दिव्या तायडे हिला दहावी च्या परीक्षेत ९०टक्के गुण



**अकोला :** श्रीमती इंदिरा देवी मोहनलाल खंडेलवाल मेमोरियल हायस्कूलची विद्यार्थिनी दिव्या तायडे हिला दहावी च्या परीक्षेत ९०टक्के गुण मिळाले.

### जयश्री योगेश अग्रवाल हिला दहावी परीक्षेत ९८.२०टक्के गुण



**अकोला :** माउंट कार्मेल हायस्कूलची विद्यार्थिनी जयश्री योगेश अग्रवाल हिला दहावी परीक्षेत ९८.२०टक्के गुण मिळाले.

### ईश्वरी दिगंबर हिला ९८.४० टक्के गुण



**अकोला :** ईश्वरी अमित दिगंबर हिला दहावीच्या परीक्षेत ९८.४० टक्के गुण मिळाले. ती माऊंट कार्मेल कॉन्व्हेंटची विद्यार्थिनी आहे.

### नैतिक स्वरुपकुमार शिंदे ९४ टक्के गुण



**अकोला :** नैतिक स्वरुपकुमार शिंदे याला दहावीच्या परिक्षेत ९४ टक्के गुण मिळाले. तो खंडेलवाल ज्ञान मंदिरचा विद्यार्थी आहे.

### श्रेयस लुगडेचे सुयश



**अकोला :** ज्युबिली इंग्लिश हायस्कुल मधील श्रेयस लुगडे याने १० वी परीक्षेत ९१ टक्के गुण प्राप्त केले. त्याचे सर्व श्रेय तो शाळेतील प्राचार्य, वर्ग शिक्षक, आई, वडील व काका काकुंना देत आहे.

## खेंडकर विद्यालयातील दहावीचा ९४ टक्के निकाल विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश



**अकोला :** जुने शहर सरस्वती नगर स्थित विष्णुपंत खेंडकर विद्यालयाचा दहावी परीक्षेचा निकाल ९४ टक्के लागला आहे. जुन्या शहरात ९० टक्के च्यावर निकालाची परंपरा कायम राखत यावर्षी विद्यार्थ्यांनी प्रावीण्य प्राप्त केले आहे. यंदा दहावी परीक्षेत शाळेतुन मुलांच्या तुलनेत मुलींनी बाजी मरली आहे. सदर शाळेच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये प्रथम कु. श्रेया नितलकुमार वानखडे प्रथम ९१.२०%, दुतीय कु. आयुष्य बिर्जुलाल शाहू ८८.६०%, तृतीय अक्षरा रामनारायण धनोकार ८७.६०% तर मानसी शितलकुमार वानखडे ८४.८०%, अंजली कृष्णा शर्मा ८०% अशा पध्दतीने शाळेतील विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश संपादन केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विष्णुपंत खेंडकर शाळेचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर, स्व. यमुनाबाई खेंडकर प्राथमीक शाळेचे मुख्याध्यापक अल्केश खेंडकर तर शिक्षक प्रज्ञानंद थोरात, श्रीकांत पागृत, गोपाल वानखडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. ९० टक्केच्यावर निकाल लागण्यासाठी शाळेमधे तज्ञ शिक्षकवृंद, सुसज्ज वर्गखोल्या व प्रयोगशाळा, ग्रंथालय, अद्ययावत सोयीसुविधा, अभ्यासपुरक वातावरण, परीक्षेची तयारी व वेळोवेळी सराव परीक्षा यामुळे आपण यश प्राप्त करू शकलो, असे मत यशस्वी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षक सुरेश सुरत्ने, प्रशांत काळे, उषा जगदाळे, आशा हिवरकर, कांचन वानखडे, मिना घाटोळे, अश्विनी सोळंके, अंजु मुंढे, रूपाली उन्हाळे, सुकेशनी ओहेकर, छाया इंगळे, वर्षा मते, वर्षा खेडकर, माया खोडके, प्रणाली धोटे, मेघा शर्मा व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे परिश्रमाने हे यश मिळाले आहे.

### जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन द्वारे सिनियर चॅम्पियनशिप व निवड चाचणी स्पर्धा

**अकोला :** सिनियर चॅम्पियनशिप व निवड चाचणी - २०२६ या स्पर्धेचे आयोजन अकोला जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन (ADAA) द्वारे दिनांक १७ मे २०२६ , रविवार रोजी वसंत देसाई स्टेडियम, अकोला या ठिकाणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेमध्ये (१६ वर्षावरील सर्व मुल- मुली) या वयोगटातील खेळाडु सहभाग घेऊ शकतात, सहभाग नोंदविण्या करिता 'https://sites.google.com/view/sporten-sporten' या संकेत स्थळावर ०७ मे ते १५ मे २०२६ या कालावधित ऑनलाईन प्रवेशिका नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑफलाईन प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. खेळाडु, पालक, प्रशिक्षक, शाळा, महाविद्याय यांच्या कडुन जास्तीत जास्त स्पर्धक खेळाडु सहभाग नोंदविण्याचे आव्हान करण्यात आले आहे.

## सेंट पॉल्स अकॅडमीच्या इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांची १००टक्के निकालाची परंपरा कायम



**अकोट :** दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील सेंट पॉल्स अकॅडमी अकोट येथील दहावीचा निकाल १००टक्के लागला असून शाळेमधून प्रथम क्रमांक जाई अमोल तायडे (९५.८० टक्के), द्वितीय क्रमांक आनंदी निलेश बन्नावडे(९५.६०टक्के),श्रद्धा एकनाथ मेंढे,(९५.६०टक्के) तृतीय क्रमांक लकी अर्जुन चोटमल (९५.२०टक्के), तसेच अर्णवी महेंद्रकुमार भाजीपाल (९४.८०टक्के), समृद्धी पंकज हुतके (९४.६०टक्के) वीराई प्रवीण चोपडे (९४.४०टक्के), अश्लेषा अविनाश सावरकर (९४.४०टक्के) माही दत्तात्रय सोळंके (९४.४०टक्के), ऋतुजा राहुल गोंडचर (९४.२०टक्के) भक्ती भास्कर मेंढे(९४.००टक्के) , कृष्णाली शरद मुऱ्हेकर (९४.००टक्के,),तेजल नंदलाल विश्वकर्मा (९३.६०टक्के) ओम गोपाल टीकार (९३.२०टक्के),गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले.

तसेच यावर्षी एकूण ११३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ९०टक्के च्या वर २९ विद्यार्थी, ८०टक्के च्या वर ४६ विद्यार्थी, ७० टक्के च्या वर २५ विद्यार्थी, ६०टक्के च्या वर १३ विद्यार्थ्यांना गुण मिळाले. या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष नवनीतजी लखोटिया ,सचिव प्रमोदजी चांडक , उपाध्यक्ष लुणकरणजी डागा,प्राचार्य विजयजी बिहाडे , उपप्राचार्य ममता श्रावगी व रिंकू अग्रवाल , अभिजीत मेंढे , सतीश ठोकळ,वनिता थोरात , जयश्री हिंगणकर , सृष्टी देशमुख,जया लाडोळे, मुकेश कहार ,यामिनी पाटील,नितीन गावंडे ,अभिलाष काळमेघ ,अगस्ती ठाकूर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना देतात. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

## उज्ज्वल पब्लिक स्कूलची यशाची परंपरा कायम; दहावीचा निकाल १०० टक्के

**बोरगाव मंजू :** शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या येथील उज्ज्वल पब्लिक स्कूलने यंदाही इयत्ता दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, सलग शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखण्यात शाळेला यश आले आहे.

यंदाच्या परीक्षेत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यामध्ये रुद्र दत्तात्रय नेमाडे यांनी ८८.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. प्राची नरेंद्र भवाने यांनी ८५.४० टक्के, श्रुती संतोष भटकर यांनी ८३.६० टक्के, जयंत इंगोले यांनी ८२.६० टक्के तर निशांत तायडे यांनी ८१.२० टक्के गुण मिळवून विशेष प्राविण्य संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापिका सौ. उज्वला नरेंद्र सोनावणे यांनी समाधान व्यक्त करताना सांगितले की, विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचा विश्वास यामुळेच हे यश शक्य झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश निश्चितच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

या यशाबद्दल मुख्याध्यापिका सौ. उज्वला नरेंद्र सोनावणे, प्रशासकीय अधिकारी सौ. निता राजेंद्र बोबडे तसेच शिक्षक प्रशांत होणाले, सौ. स्वाती जैन, सौ. मीना वानखेडे, मोहिनी इंगळे, रूपाली कडू, सौ. शारदा देशमुख, सौ. दिपाली देशमुख, सौ. कुमुद काटोले, श्रीमती स्मिता पाटील, सौ. जया हगवणे, दुर्गा असलमोल, प्रीती वाघमारे, अश्विनी माहुलकर, रूपाली इंगळे, पूजा भराते व प्रतीक वानखेडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शाळेच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत असून, आगामी काळातही गुणवत्तेचा आलेख अधिक उंचावेल, असा विश्वास शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

## वसुंधरा ज्ञानपीठचा सलग १५ व्या वर्षी १०० टक्के निकाल

प्रतिनिधी ९ मे



**अकोट :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती विभागातर्फे घेण्यात आलेल्या मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (एएण) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत अकोट येथील वसुंधरा ज्ञानपीठ शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. शाळेने सलग १५ व्या वर्षी १०० टक्के निकालाची नोंद करून शैक्षणिक क्षेत्रात पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. यावर्षी शाळेतून एकूण ४४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. विशेष म्हणजे सर्वच्या सर्व विद्यार्थ्यांनी यश संपादन करत शाळेचा निकाल १०० टक्के लागला. विद्यार्थिनींनी यंदाच्या निकालात विशेष चमकदार कामगिरी करत आपले वर्चस्व सिद्ध केले.

कु. आसना बनसोड हिने ९६.४० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान पटकावला. तसेच कु. अनुश्री बुंदिले हिने ९४.०० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

मुलांमध्ये चि. सर्वेश सावरकर याने ९०.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, तर चि. आदित्य अवारे याने ८८.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. निकालाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत —

९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करणारे विद्यार्थी : ५

८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करणारे विद्यार्थी : १५

एकूण निकाल : १०० टक्के (सलग १५ वे वर्ष)

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. शाळेच्या या दैदिप्यमान यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## सैयद मोहसीन उर्दू हायस्कूल शिवणीचा ९५.४५ टक्के निकाल

**अकोला :** यंग मुस्लिम एज्युकेशन ॲड. सोशल वेल फेअर सोसायटीच्या सैयद मोहसीन उर्दु हरास्कुल शिवणीचा माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ९५.४५ टक्के लागला.



परीक्षेची टेस्ट सिरीज, विद्यार्थ्यांचे शंका निरासन करण्यासाठी विशेष तासिकांचे नियोजन केले जाते. सैयद मोहसीन उर्दु हायस्कुल शिवणी शाळेची निकालाची परंपरा कायम राखली. शाळेतील ५ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत, १८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर १९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विशेष उल्लेखनीय विद्यार्थ्यांमध्ये

तनुजा परवीन शेख खलील ८२.२०, अशफीया फिरदोस अफरोज खान ७७.००, फायका अंजुम मोहम्मद हारुन ७६.८०, तहेरीन अशना साबीर बेग ७४.८०, महेवीश फीरदोस शेख असलम ७४.००, साबरा परवीन मोहम्मद नौशाद ७१.६०, इफरा ॲयमन हफीज खान ७१.४०, अलविना कशफ अहेमद खान ७१.००, सिदराह बॅनीश अनीस खान ७०.८० सबा फीरदोस कादर खान ७०.८०.

संस्था सचिव सैयद अकबर अब्दुल्ला यांनी विधार्थ्यांचे अभिनंदन केले. मुख्याध्यापक सैयद मोहीब इकबाल तसेच सर्व शिक्षकांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाचे सर्वस्तरांवरुन कौतुक होत आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. ९ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## दहागावच्या स्टुडन्ट्स वेल्फेअर स्कूलचा दहावीला शंभर टक्के निकाल कायम

प्रतिनिधी ९ मे

**उमरखेड :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेचा निकाल गुरुवारी जाहीर झाला असून दहागाव येथील स्टुडन्ट्स वेल्फेअर इंग्लिश मीडियम स्कूलने सलग १४ वर्षांची शंभर टक्के निकालाची परंपरा यंदाही कायम राखली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शाळेच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा छाप पाडली. शाळेतून प्रणाली जयवंतराव चव्हाण हिने ९३.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. गौरव दिपक शिंदे याने ९२.८० टक्के गुणांसह द्वितीय, तर प्रज्वल प्रदीप तळेगावकर याने ९२.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. स्वरा आशिष लासिनकर हिने ९१.८० टक्के गुणांसह चौथा, तर प्रांजली ज्योतिबा बरगे हिने ९०.२० टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक पटकावला. यंदा शाळेतील सहा विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळविले असून २२ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत. वरित विद्यार्थीही उत्कृष्ट श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

# यवतमाळ–पांढरकवडा मार्गावरील काम निकृष्ट

प्रतिनिधी ९ मे

**यवतमाळ :** जिल्ह्यात सुरू असलेल्या सिमेंट रस्ते बांधकामांमध्ये गंभीर अनियमितता होत असल्याचे आरोप समोर आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीतील काही प्रकल्पांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता आणि प्रत्यक्ष देखरेखीचा अभाव असल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. यवतमाळ–पांढरकवडा मार्गावरील सुमारे ३७ किलोमीटर रस्त्याच्या कामांवर विशेषतः प्रश्न उपस्थित होत आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, संबंधित अधिकारी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी न जाता कार्यालयातूनच कामकाजावर नियंत्रण ठेवत असल्याचा आरोप होत आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आणि बैठकींच्या माध्यमातून 'रिमोट कंट्रोल' पद्धतीने प्रशासन चालत असल्याने बांधकामातील दर्जा तपासणी, साहित्याची गुणवत्ता आणि तांत्रिक निकषांकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार आहे. याचा फायदा घेत कंत्राटदारांकडून निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

### धुळीचा त्रास; प्रशासनाच्या भूमिकेबाबत नाराजी

#### चौकशीची मागणी

■ सार्वजनिक निधीतून सुरू असलेल्या या कामांमध्ये पारदर्शकता आणि जबाबदारीचा अभाव असल्याचा आरोप होत असून, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा विकासाच्या नावाखाली सुरू असलेली ही कामे जनतेसाठी अधिक त्रासदायक ठरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

कामाच्या ठिकाणी कामगारांना मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचेही समोर आले आहे. डिझेलअभावी यंत्रसामग्री बंद पडणे, जेवणाची सोय नसणे अशा अडचणींमुळे कामगारांची कुचंबणा होत असल्याचे सांगितले जाते. प्रत्यक्ष देखरेखीचा अभाव असल्याने कामगारांच्या समस्या वाढत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, रस्त्यांच्या अपूर्ण कामांमुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. उडणाऱ्या धुळीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांमध्ये श्वसनाचे त्रास वाढत असल्याच्या तक्रारी आहेत. धुळीमुळे दुकानदारांचेही नुकसान होत असून, व्यवसायावर परिणाम झाल्याचे स्थानिक सांगत आहेत. काही ठिकाणी अवजड यंत्रसामग्रीमुळे घरांना तडे गेल्याचाही आरोप आहे.




ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी व निदर्शने करूनही प्रशासनाकडून ठोस प्रतिसाद मिळत नसल्याने नाराजी वाढली आहे. अधिकारी व कंत्राटदार यांच्यातील संगनमतामुळे परिस्थिती गंभीर झाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. "विकासकामेच जर अडचणीत आणत असतील, तर दाद कुणाकडे मागायची?" असा सवाल स्थानिकांनी उपस्थित केला आहे.

कामाच्या गुणवत्तेची शेवटची तपासणी कधी झाली, प्रत्यक्ष पाहणी का होत नाही, तसेच तक्रारी असूनही कारवाई का होत नाही, याबाबत प्रशासनाकडून स्पष्टता नसल्याने प्रश्न कायम आहेत.

## अवकाळी पावसाचा तडाखा; रायपूरच्या कोलाम वस्तीतील अनेक कुटुंबे बेघर

प्रतिनिधी ९ मे

**झरी जामणी :** तालुक्यातील रायपूर गावात गुरुवारी सकाळी झालेल्या अवकाळी पावसाने कोलाम वस्तीतील अनेक कुटुंबांचे मोठे नुकसान झाले. मुसळधार पावसामुळे घरांमध्ये पाणी शिरले असून धान्य, कपडे व अन्य जीवनावश्यक साहित्याचे नुकसान झाले आहे. काही घरांची पत्रे उडाल्याने अनेक कुटुंबांवर बेघर होण्याची वेळ आली आहे.

रायपूर येथील कोलाम वस्तीत प्रामुख्याने मजूर आणि अल्पभूधारक शेतकरी राहतात. आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या या कुटुंबांवर अवकाळी पावसामुळे नव्या संकटाचे सावट निर्माण झाले आहे. पावसाच्या जोरदार तडाख्यामुळे अनेक घरांचे छप्पर उडाले असून घरातील वस्तूंची नासधूस झाली आहे.



घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्त्या सौ. इंदिरा बांदे यांनी प्रशासनाकडे तातडीने मदतीची मागणी केली. "कोलाम समाज हा अतिमागास म्हणून ओळखला जातो. नैसर्गिक आपत्तीमुळे या कुटुंबांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून महसूल विभागाने तात्काळ पंचनामा करून शासनाची मदत द्यावी," अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, प्रशासनाने नुकसानग्रस्तांकडे दुर्लक्ष केल्यास कोलाम ब्रिगेडच्या वतीने आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. संबंधित महसूल अधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदन देण्यात येणार असून नुकसानग्रस्त कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी कोलाम ब्रिगेड त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असेही सांगण्यात आले.

## ऋषिका रुणवाल हिला ९८.६० टक्के गुण

### वेळेचे नियोजन ठरले यशाची गुरुकिल्ली

प्रतिनिधी ९ मे

**दिग्रस :** विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूल येथील विद्यार्थिनी ऋषिका रुणवाल हिने दहावी परीक्षेत ९८.६० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे शाळेसह परिसरात तिचे कौतुक होत आहे.



सातत्यपूर्ण मेहनत, अभ्यासातील एकाग्रता आणि जिद्दीच्या जोरावर ऋषिकाने हे यश मिळवले. प्रत्येक विषयाची सखोल तयारी, अभ्यासातील शिस्त आणि वेळेचे योग्य नियोजन यामुळे तिला उत्कृष्ट गुण प्राप्त झाले.

भविष्यात 'नीट' परीक्षेच्या माध्यमातून डॉक्टर होण्याचा तिचा मानस असून, त्यासाठी ती आतापासूनच तयारी करत आहे. तिच्या यशाबद्दल शिक्षक, पालक आणि मित्रपरिवाराकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## उमरखेड बसस्थानकावर मंगळसूत्र चोरट्यांचा धुमाकूळ; दोन महिलांचे दागिने लंपास



### सीसीटीव्ही फुटेजची तपासणी

■ गेल्या काही महिन्यांपासून उमरखेड बसस्थानक परिसरात महिलांचे दागिने चोरीच्या घटना सातत्याने घडत आहेत. यापूर्वी नागपूर येथील एका टोळीचा पर्दाफाश करण्यात आला होता. मात्र, गुरुवारी घडलेल्या घटनेवेळी बसस्थानकावर एकही पोलीस कर्मचारी उपस्थित नसल्याची चर्चा होती. दरम्यान, पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू केली असून आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी तक्रारदारांकडून करण्यात आली आहे.

प्रतिनिधी ९ मे

**उमरखेड :** शहरातील बसस्थानक परिसरात मंगळसूत्र चोरट्यांनी पुन्हा धुमाकूळ घातला असून दोन महिलांच्या गळ्यातील सुमारे ४५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना गुरुवारी दुपारी घडली. याप्रकरणी उमरखेड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निलाबाई विश्वनाथ विनकरे (वय ५५, रा. ढाणकी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या नातेवाईकाच्या लग्नसमारंभासाठी नांदेड येथे गेल्या होत्या. समारंभ आटोपून त्या गुरुवारी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास उमरखेड बसस्थानकावरून ढाणकीकडे जाण्यासाठी उमरखेड-जेवली बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील एक ग्रॅम सोन्याचे १४ मणी व प्रत्येकी दोन ग्रॅम वजनाचे दोन मंगळसूत्र, असा सुमारे २० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याचवेळी चातारी येथील जनाबाई यादवराव धात्रक (५५) यांच्या गळ्यातील २० सोन्याचे मणी व दोन मंगळसूत्र असा सुमारे २५ हजार रुपयांचा ऐवजही चोरीस गेला. दोन्ही घटनांमध्ये मिळून सुमारे ४५ हजार रुपयांचे दागिने चोरीस गेल्याची नोंद पोलिसांत करण्यात आली आहे.

लग्नसराईमुळे बसस्थानकावर महिलांची मोठी गर्दी होत असून त्याचा फायदा घेत मंगळसूत्र चोरट्यांनी पुन्हा सक्रियता वाढविल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर बसस्थानक परिसरात पोलिस बंदोबस्त वाढविण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

## महामहसूल शिबिरास प्रतिसाद; तीन हजार नागरिकांनी घेतला लाभ

प्रतिनिधी ९ मे

**कळंब :** प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने महसूल विभागाच्या वतीने मेटिखेडा येथे "छत्रपती शिवाजी महाराज महा महसूल समाधान शिबिर" आयोजित करण्यात आले. जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणात पार पडलेल्या या शिबिरात सुमारे तीन हजार नागरिकांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला.

जिल्हाधिकारी विकास मीना, उपविभागीय अधिकारी एस. एस. पाटील आणि तहसीलदार धीरज स्थूल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबिराची सुरुवात प्रभात फेरीने झाली. नायब तहसीलदार अनिल राजगुरे आणि अभय देशपांडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेटिखेडा येथील सरपंच राणीताई कुळसंगे होत्या. शिबिरात सातबारा दुरुस्ती, प्रलंबित फेरफार, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्र वितरण, सामाजिक अर्थसहाय योजनांचे लाभ, घरांसाठी पट्टेवाटप, ई-मोजणी अर्ज, ॲग्री स्टॅक, पीएम किसान नोंदणी आदी सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच भूसंपादन, अकृषक परवानगी आणि तुकडेबंदी प्रकरणांचाही निपटारा करण्यात आला.



याशिवाय महसूल, कृषी, आरोग्य, भूमी अभिलेख, परिवहन, पुरवठा, दुय्यम निबंधक, पशुसंवर्धन, महिला व बालविकास, उमेद, महावितरण तसेच वनविभागाच्या स्टॉलद्वारे विविध योजनांची माहिती व लाभ देण्यात आले. उपस्थित अधिकाऱ्यांनी सर्व स्टॉलना भेट देत योजनांची माहिती जाणून घेतली. शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना साहित्य वाटप तसेच पीएफएमएसद्वारे भत्ता वितरण करण्यात आले. मुख्यमंत्री सुंदर शाळा पुरस्कार प्राप्त शाळेचा गौरव करण्यात आला. शाळेसाठी जमीन दान देणारे अंतरगाव येथील शेतकरी भद्रुद्दीन कोठडिया यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाडीबीटी परीक्षा प्रमाणपत्र, धान्य सितारे प्रमाणपत्र, क्रीडा प्राविण्य प्रमाणपत्र, बीएलओ नाव दुरुस्ती तसेच आश्रम शाळांतील भौतिक सुविधांबाबत माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला नायब तहसीलदार माला गेडाम, निरीक्षण अधिकारी संध्या मनोहर, भूमी अभिलेख विभागाच्या सौ. पांडे, नानने साहेब तसेच वीज वितरण कंपनीचे डी. वाय. देशपांडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळ अधिकारी घरकल, राजहंस, सर्व तलाठी तसेच गुणवंत राऊत, प्रल्हाद भाऊ सलाम आणि बंडू राऊत यांनी परिश्रम घेतले.

## घरकुल योजनेपासून वंचित लाभार्थ्यांना पुन्हा संधी द्या – प्रीती शिवरामवार यांची मागणी

प्रतिनिधी ९ मे

**आर्णी :** नगर परिषद अंतर्गत प्रधानमंत्री घरकुल योजनेच्या २०२४-२५ च्या डीपीआरनुसार मंजूर झालेल्या शंभरहून अधिक लाभार्थ्यांना आर्थिक परिस्थितीअभावी योजनेचा लाभ घेता आला नाही. या लाभार्थ्यांना विशेष बाब म्हणून पुन्हा घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी प्रीती योगेश शिवरामवार यांनी नगराध्यक्षांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अनेक लाभार्थी आर्थिक अडचणींमुळे घरकुल बांधकामाची प्रक्रिया पूर्ण करू शकले नाहीत. त्यामुळे ते योजनेपासून वंचित राहिले.



सध्या अनेक लाभार्थी पुन्हा योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक असून त्यांनी पीएमसीकडे संपर्क साधला असता, तांत्रिक कारणांमुळे लाभ देणे शक्य नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे वंचित लाभार्थ्यांना पुन्हा संधी देण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय प्रभाग क्रमांक १० मधील भाजी मंडी रोडवरील नाली बांधकाम गेल्या महिन्याभरापासून संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधित काम तातडीने पूर्ण करण्याची मागणीही करण्यात आली. दरम्यान, शहरातील मच्छी बाजार हा वर्दळीच्या रस्त्यावर असल्याने मासे विक्रेत्यांकडून रस्त्यावर दुकाने लावली जात असून त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. पर्यायी व्यवस्था होईपर्यंत नियोजित पोलीस स्टेशनच्या जागेवर मासे विक्रीस परवानगी द्यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

## कारागृहातील बंद्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण !

**यवतमाळ :** कारागृहातील बंद्यांना कारागृहातून बाहेर पडल्यानंतर सन्मानपूर्वक जीवन जगता यावे, तसेच पुन्हा गुन्हेगारीकडे न वळता रोजगार व स्वयंरोजगाराच्या माध्यमातून स्वतःचे आणि कुटुंबाचे उदरनिर्वाह करता यावा, यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, यवतमाळ यांच्या माध्यमातून कारागृहात मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमास जिल्हाधिकारी विकास मीना तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांनी विशेष मंजुरी दिली आहे.

## स्वगणना हीच जबाबदारी; प्रत्येकाने पुढाकार घ्यावा – जिल्हाधिकारी विकास मीना

प्रतिनिधी ९ मे

**महागाव :** आगामी जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर महागाव तालुक्यातील कलगाव येथील माउंट लिट्रा झी स्कूल येथे सुरू असलेल्या जनगणना प्रशिक्षण केंद्राला जिल्हाधिकारी विकास मीना यांनी भेट देत प्रशिक्षणार्थी शिक्षकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी जनगणना ही केवळ शासकीय प्रक्रिया नसून देशाच्या नियोजनाचा कणा असल्याचे सांगत प्रत्येकाने स्वगणना करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

जिल्हाधिकारी मीना यांनी उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन करताना जनगणनेतील अचूक माहितीचे महत्त्व अधोरेखित केले. "जनगणना ही देशाच्या विकासाची दिशा ठरवणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपली माहिती अचूकपणे नोंदवणे गरजेचे आहे. स्वगणना ही संकल्प ना यशस्वी करण्यासाठी शिक्षकांनी जनजागृतीत महत्त्वाची भूमिका बजवावी," असे त्यांनी नमूद केले.



प्रशिक्षण केंद्रातील व्यवस्थेची पाहणी करत त्यांनी प्रशिक्षणार्थींशी थेट संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. जनगणना प्रक्रियेत येणाऱ्या तांत्रिक बाबी, माहिती संकलनातील बारकावे तसेच नागरिकांशी संवाद साधताना घ्यावयाची काळजी याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. यामुळे उपस्थित शिक्षकांना प्रत्यक्ष काम करताना अधिक आत्मविश्वास मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या भेटीदरम्यान उपविभागीय अधिकारी राम मुळे, तहसीलदार अभय मस्के तसेच नायब तहसीलदार (निवडणूक) वैभव पवार मंडळ अधिकारी प्रकाश माने,मारोती एकूलवार यांनीही प्रशिक्षणार्थींना आवश्यक सूचना दिल्या. त्यांनी जनगणना कार्य वेळेत आणि अचूक पार पाडण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशिक्षण केंद्राच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करत आगामी जनगणना यशस्वी करण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम करावे, असे सांगितले.भेटी दरम्यान माऊंट लिटीरा झी स्कुल संचालक विशाल पांडे सेक्रेटरी परवेज सुरैय्या, शहाबाज सुरैय्या वतीने जिल्हाधिकारी विकास मीना यांचे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

## महसूल समाधान शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद

प्रतिनिधी ९ मे

**झरी जामणी :** तालुक्यातील माथार्जून येथे आयोजित करण्यात आलेले "छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर" उत्साहात पार पडले.

शासकीय आश्रम शाळा, माथार्जून येथे झालेल्या या शिबिरामध्ये नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आला. शिबिरात उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला, फार्मर आयडी, आयुष्मान भारत कार्ड, रेशन कार्ड, निराधार योजना, जन्म-मृत्यू दाखले, मतदान ओळखपत्र दुरुस्ती, नवीन मतदान कार्ड, पीएम किसान योजना तसेच आधार कार्ड अद्ययावत करण्यासंदर्भातील सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. परिसरातील नागरिकांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध योजनांचा लाभ घेतला. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार फेऱ्या मारण्याची गरज कमी झाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.दरम्यान, महसूल विभागाच्या या लोकाभिमुख उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत करण्यात आले असून शिबिर यशस्वीरित्या पार पडल्याने परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



**श्रीमती ए. यु. यादव, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पुसद, जि. यवतमाळ यांचे न्यायालयात. वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत**

### जाहीरनामा

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६४/२०२६
श्रीमती श्रुती कल्याणकर २-वि- कोणीही नाही
**नेमलेली तारीखः- १०/०६/२०२६.**

**अर्जदार :-** १ श्रीमती श्रुती धनंजय कल्याणकर, वय ४३ वर्ष, धंदा - घरकाम. २. ईशान धनंजय कल्याणकर, वय १३ वर्ष, धंदा शिक्षण, ३. कु. किया धनंजय कल्याणकर, वय अं. ५ वर्षे, धंदा- शिक्षण. अर्जदार क्रं. ०२ व ०३ अज्ञान तर्फे अ पा क आई आवेदीका क्रं. १ श्रीमती श्रुती धनंजय कल्याणकर, क्र. ०१ ते ०३ सर्व रा. व्दारा अनिल हरीभाऊ येल्हेकर यांच्या घरी, लक्ष्मीनगर, बोरगडी, पो. बोरी खुर्द, ता. पुसद जि. यवतमाळ

**- विरूद्ध -**

**गैरअर्जदार :- कोणीही नाही.**

ज्याअर्थी मयत धनंजय गोपाळराव कल्याणकर हे दि. २७.०५.२०२५ रोजी मयत झाले. मयतचे वारस या नात्याने वरील अर्जदार यांनी या न्यायालयाकडे मुंबई विनियमचे धारा ८ सन १८२७ चे तरतूदी नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वरील अर्जदार व गैरअर्जदार हे मयत धनंजय गोपाळराव कल्याणकर यांचे वारस नव्हे व वारसाचे प्रमाणपत्र देवु नये असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिध्द झालेल्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात प्रत्यक्ष स्वतः किंवा आपले वकीलामार्फत हजर राहून आपला उजर अथवा आक्षेप लेखी स्वरूपात दाखल करावा. सदरच्या तारखेनंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर अथवा आक्षेप नाही असे ग्राहय धरले जाईल व सदरहू अर्ज नियमानुसार निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०४/२०२६ रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली आहे.

| तयार करणार | आदेशानुसार |
|---|---|
| कनिष्ठ लिपीक, ४ थे सह दिवाणी न्यायालय क. स्तर, पुसद ता. पुसद, जि. यवतमाळ. | सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, पुसद. ता. पुसद, जि. यवतमाळ. |

# सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. ९ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## आयआयएचटी बरगढ व वेंकटगिरी येथे हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका प्रवेशाबाबत सुचना जारी

**अमरावती:** केंद्र शासनाच्या भारतीय हातमाग तंत्रविज्ञान संस्थेत सन २०२६-२७ या शैक्षणिक सत्रासाठी तीन वर्षीय (सहा सत्रीय) हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील पात्र उमेदवारांकडून १० जून २०२६ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत असल्याची माहिती वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.



अमरावतीची होली क्रॉस शाळेची विद्यार्थिनी सई सतीश मोकलकर विज्ञान शाखेतून ९९.६० टक्के गुण घेऊन प्रथम या यशामुळे तिचे कौतुक होत आहे.

## श्री. देवराव दादा हायस्कूल तिवसाचा एसएससी परीक्षेचा निकाल ८१.६५ टक्के

प्रतिनिधी ९ मे

**तिवसा :** तिवसा तालुक्यातील नावाजलेली शाळा श्री. देवराव दादा हायस्कूलचा दहावीचा निकाल ८१.६५ टक्के लागलेला आहे. दहावीला एकुण १६९विद्यार्थी होते. त्यापैकी १६९विद्यार्थीपरीक्षेला प्रविष्ट झाले होते.व त्यापैकी नैतिक उमेशराव आमले व पूर्वा हेमंत पखाले हे विद्यार्थी प्रथम आले असून प्राविण्य श्रेणीत २३ विद्यार्थी व प्रथम श्रेणीत ४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.नैतिक उमेशराव आमले व पूर्वा हेमंत पखाले ८८.२० टक्के गुण




घेवून विद्यालयात प्रथम आलेले आहे.तर दिशा गजानन लांडे ८७.४० टक्के घेवून दुसरी व आयुष सुधीरराव सोमवंशी ८६.४० टक्के गुण घेऊन विद्यालयात गुणानुक्रमे ३रा आलेला आहे.

अशा पध्दतीने विद्यालयाने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

या अभुतपुर्व यशाबद्दल श्री गणेश दास राठी छात्रालय समिती अमरावती चे अध्यक्ष वसंतबाबु मालपाणी, संस्थेचे उपाध्यक्ष जुगलकिशोर गट्टाणी,सचिव डॉ गोविंद जी लाहोटी, कोषाध्यक्ष श्री प्रकाश जी हेडा,सहसचिव श्री मोहन कुमार कलंत्री, प्रशासकीय अधिकारी डॉ आभा लाहोटी, महाविद्यालयाचे प्राचार्य चौधरी सर, पटेल सर पंचारीया सर,,वर्ग शिक्षक तायडे सर,गांधी सर व तालन मॅडम,जोशी सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## अमरावती विभागात एसएससी माध्यमिक बोर्डाचा निकाल जाहीर

प्रतिनिधी ९ मे

**अमरावती :** अमरावती विभागात एक लाख ६१ हजार ७१९ पैकी विद्यार्थी हे परीक्षेला बसले होते त्यापैकी एक लाख साठ हजार ३७ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. त्यापैकी पास झालेले विद्यार्थी एक लाख ४४ हजार आठशे पत्तीस यावर्षी अमरावती विभागाचा निकाल ९०.५०ज्ञ् मागच्या वर्षी ९२.९५ इतका अमरावती विभागाचा रिझल्ट लागला होता.



दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा मुलींनी बाजी मारलेली आहे. मुलांचे निकाल टक्केवारी ८७.३५. मुलींचे निकाल टक्केवारी ९४.०९ आहे. ९ते २३ मे दरम्यान या पंधरा दिवसात जे काही परीक्षार्थी आहेत छाया प्रत किंवा गुण पडताळणी अर्ज करू शकतात तसेच राज्य मंडळांनी ठरवल्या १० क्रमांकावर समुपदेशन उपलब्ध आहे परीक्षा संदर्भात काही अडचणी असल्यास त्यावर संपर्क करून मार्गदर्शन मागू शकतात.

## अमरावतीमधील खंडेलवाल ज्वेलर्सच्या इमारतीला भीषण आग

प्रतिनिधी ९ मे

**अमरावती:** अमरावतीमधील खंडेलवाल ज्वेलर्सच्या इमारतीला भीषण आग लागल्याची घटना आज दुपारी उघडकीस आली.

इमारतीच्या पहिल्या मजल्यावरून धुराचे लोट उठत होते. पहिला मजला अनेक वर्षांपासून रिकामा होता. आगीची बातमी कळताच जयस्तंभ चौक परिसरात घबराट पसरली. पोलीस आणि अग्निशमन दलाची पथके घटनास्थळी दाखल झाली. युद्धपातळीवर आग विझवण्याचे काम सुरू झाले. घटनास्थळाजवळ पेट्रोल पंप असल्याने धोका वाढला होता. जयस्तंभ चौक परिसरात मोठी गर्दी जमल्याने प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती.



## जलयुक्त शिवार अभियान २.०: अमरावती जिल्ह्यात जलसंधारणाच्या कामांना गती

प्रतिनिधी ९ मे

◆ ५९७ कामांना प्रशासकीय मान्यता

**अमरावती:** पाणी टंचाईवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी आणि जिल्ह्याची सिंचन क्षमता वाढवण्यासाठी राज्य शासनाच्या निर्णयानुसार 'जलयुक्त शिवार अभियान २.०' अमरावती जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पावसाचे पाणी अडवणे, भूजल पातळी वाढवणे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे आणि जमिनीचा पोत सुधारणे या त्रिसूत्रीवर भर देण्यात येत असून या उन्हाळ्यात विविध यंत्रणांमार्फत मोठ्या प्रमाणावर कामांचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष निधीतून जिल्ह्यातील विविध यंत्रणांना ५९७ कामांसाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. यामध्ये भूजल सर्वेक्षण यंत्रणेमार्फत ६०३ कामांसाठी ५ कोटी १५ लाख रुपये, मृद व जलसंधारण विभाग (जिल्हा परिषद) अंतर्गत ११ कामांसाठी १ कोटी ६९ लाख रुपये, तर मध्यम व लघु पाटबंधारे विभाग अचलपूर अंतर्गत ४ कामांसाठी १ कोटी २८ लाख रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यावर्षी अभियानाला अतिरिक्त प्रोत्साहन देऊन जास्तीत जास्त कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. पाणी साठवणुकीच्या नवीन सुविधा निर्माण झाल्यामुळे सिंचन क्षेत्रात वाढ होणार असून, याचा थेट फायदा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढवण्यासाठी होणार आहे. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी अमरावती जिल्हा प्रशासन आणि संबंधित विभाग पूर्ण तत्परतेने हे अभियान राबवित आहेत.

## नगरसेवक किशोर जाधव यांची झोन क्र.४ मिनी महापौर पदी नियुक्ती; बडनेरा येथे पदग्रहण सोहळा

प्रतिनिधी ९ मे

**अमरावती :** आ.रवि राणा यांच्या नेतृत्वाखाली युवा स्वाभिमान पार्टीचे प्रभाग क्र.२२ चे नगरसेवक किशोर जाधव यांची झोन क्र.४ मिनी महापौर पदी नियुक्ती झाल्यानंतर बडनेरा येथे भव्य पदग्रहण सोहळ्याचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. शहरातील कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

या पदग्रहण सोहळ्याला राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टीचे अध्यक्ष निळकंठराव कात्रे, भ्एझ् चे मार्गदर्शक सुनिल राणा, उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते किशोर जाधव यांनी झोन क्र.४ मिनी महापौर पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात व फटाक्यांच्या



आतषबाजीत त्यांचे स्वागत करून अभिनंदन केले.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी किशोर जाधव यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत बडनेरा शहराच्या विकासासाठी प्रभावीपणे काम करण्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच शहरातील प्रलंबित प्रश्न, मूलभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता व नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी युवा स्वाभिमान पार्टी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

यावेळी आपल्या मनोगतात किशोर जाधव यांनी सांगितले की, आ.रवि राणा यांच्या मार्गदर्शन व निर्देशानुसार बडनेरा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव तत्पर राहणार असून नागरिकांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. झोन क्र.४ मधील विकासकामांना गती देत सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्याचा प्रयत्न करणार आहे.

संपूर्ण परिसर घोषणांनी दुमदुमून गेला असून कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी नगरसेवक प्रा.श्री.प्रशांत आनंदराव वानखडे, शिक्षण सभापती अ‍ॅड. सौ.प्रिती हर्षल रेवणे, नगरसेवक संजय हिंगासपुरे, नगरसेवक श्रीमती सुमती ढोके, नगरसेवक .अजय मदनमोहन जयस्वाल, नगरसेवक .दिपक किसनलाल साहु, नगरसेवक श्रीमती नंदा धनंजय सावदे, नगरसेवक सौ.रजनी राजेश डोंगरे, नगरसेवक सौ.गौरी शैलेंद्र मेघवानी, नगरसेवक श्री.महेश धनराज मुलचंदानी, नगरसेवक श्री.योगेश रघुनाथ विजयकर, नगरसेवक सौ.अर्चना अशोक पांडे, नगरसेवक सौ.प्रियंका भुषण पाटणे, नगरसेवक मिराताई कांबळे, नगरसेवक मधुरा मिलींद कहाळे, नगरसेवक लता देशमुख, नगरसेवक राजेंद्र तायडे, कमल किशोर मालानी, प्रा.अजय गाडे, नितीन बोरेकर, विनोद जायलवाल, विनोद गुहे, अविनाश काळे, राजा बागडे, चंद्रकांत पाटील, हरभजन सिंग, पंकज शर्मा, पवन भिंडा, शंकर खंडारे, पराग चिमोटे, मुकेश उसरे, भुषण पाटणे, संदीप कांबळे, शिंदे साहेब, अत्रे गुरुजी, समिक्षा गोटेफोडे, ज्योती भिसने, वंदना पवार, गजु सावंत, सुरज चाफले, सचिन पवार, मुश्ताक भाई, राजभैरव, अनिल पारसकर, सुचिता पाटील, चौधरी ताई, संगिता बरमैय्या, रईसा परविन, मोकाशे ताई, मंगेश खोंडे, जितु मोटवानी, अमित मिश्रा, शहेजाद अहमद, सिद्धार्थ बनसोड, तुषार दुधे, जाधव काका, अंकुश पकडे, नितीन सोळंके, मंगेश सोळंके, पवन भोयर, भुषण जोशी, शशिकांत नन्नावरे, रितेश निखार, मिलींद झंझाड, विक्की जाधव, निलेश पवार, कालुसेठ, पवन दळवी, बबलु आठवले, किरण अंबाडकर, अशोक पांडे, विजय मलिक, समाधान वानखडे, घनश्याम डकरे, दिलीप भाकरे, विजया घोडेस्वार तसेच या कार्यक्रमाचे संचालन अमोल मिलखे यांनी केले असुन या कार्यक्रमाला युवा स्वाभिमान पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी सदस्य तसेच बडनेरा परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अमरावती विभागीय पशुसंवर्धन आयुक्त - उपायुक्त यांचा पाहणी दौरा

दर्यापूर तालुक्यातील माहुली ( धांडे ) गोरक्षण संस्था स्थळाचे परीक्षण

प्रतिनिधी ९ मे

**दर्यापूर :** आपल्या कार्यालयीन दौऱ्या दरम्यान महाराष्ट्र गोसेवा आयोग संलग्न गोरक्षण संस्था यांची पाहणी करतांना अमरावती विभागीय पशु संवर्धन आयुक्त डॉ वाय . एस . वंजारी , उपायुक्त डॉ संजय कावरे तथा सहाय्यक आयुक्त डॉ प्रतिक बोडखे यांनी दर्यापूर तालुक्यातील माहुली ( धांडे ) येथील शासन पंजीबद्ध तथा अनुदानीत गाडगेबाबा गोरक्षण संस्थेची सखोल पाहणी केली .या भेटी दरम्यान अधिकारी वर्ग यांनी संस्थेचे संस्थापक संचालक प्रा . गजानन भारसाकळे यांचेशी विस्तृत चर्चा करीत दैनंदिन चारापाणी, चराई, मनुष्यबळ, अन्नसाठा, स्वच्छता तथा सांडपाणी व्यवस्थापन, गोमूत्र तथा शेणखत सेवा सामुग्री, मशीनरी व संशोधन कार्य या बाबीबर प्रत्यक्ष



> गोसेवेच्या कार्यात शासकीय आर्थिक सहकार्याची जोड असल्याने हे कार्य प्रगती पथावर जात आहे.
> **- प्रा. गजानन भारताकळे** ( गोरक्षण संस्यापक )

> तालुका स्तरावर पशुसंवर्धन व संगोपन प्रक्रियेत आरोग्य विषयक आम्ही जातीने लक्ष पूरवीत आहोत.
> **- सहाय्यक उपायुक्त डॉ. प्रतिक बोडखे**

> पशुसंवर्धन विभागासाठी शासनाच्या भरपूर अनुदान योजना कार्यान्वीत आहेत .
> **- उपायुक्त** डॉ. संजय कावरे

> शेतकरी जीवनाला वैभव प्राप्त करून देणारा हा उपक्रम शेतकरी हिताचा आहे .
> **आयुक्त डॉ वाय एस वंजारी**

गायींच्या गोठ्यात चर्चा करून माहीती घेतली . संस्थेच्या कामकाजावर तसेच संवर्धन, संगोपन तथा गोवरी व खतावरील यशस्वी संशोधन कार्यावर समाधान व्यक्त केले . सुदृढ़ गाय - वासरांबद्दल अधिकारी वर्ग यांनी संस्थेचे विशेष अभिनंदनही केले व शासनाच्या नियोजीत विशेष प्रकल्पासाठी या गोरक्षण संस्थेच्या भविष्यातील निवडीबाबत संकेतही दिले.

## दर्यापुरात वादळी पाऊस; रात्रभर बत्ती गुल

प्रतिनिधी ९ मे

**दर्यापूर:** दर्यापूर शहरात रात्री अडीच वाजता दरम्यान वादळी वाऱ्यासह धो- धो पाऊस बरसला.

यामध्ये काही ठिकाणी इलेक्ट्रिक पोल च्या तारा खाली पडल्या होत्या. तसेच काही ठिकाणी वृक्ष सुद्धा कोलमळून पडले होते . त्यामुळे रात्रभर दर्यापूर शहराची बत्ती गुल होती. त्यामुळे नागरिकांना रात्र अंधारातच काढावी लागली. हा अकाली पाऊस दर्यापूर शहरासह इतर ग्रामीण भागातही बरसला असून यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली होती.



## महावितरणने दिली दुरूस्ती कार्याला गती

प्रतिनिधी ९ मे

◆ वादळचा कहर - महावितरण यंत्रणेला मोठा फटका

**अमरावती:** वादळामुळे अस्त -व्यस्त झालेल्या वीज यंत्रणेच्या दुरूस्ती कामाला महावितरणने लगेच सुरूवात केली आहे. कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे व उपकार्यकारी अभियंता जंयत घाटे प्रत्यक्ष फिल्डवर पोहचले असून नुकसानाची माहिती घेत दुरूस्ती कार्याला जोरदार गती दिली आहे. त्यामुळे या काळात वीज ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन कार्यकारी अभियंता यांनी केले आहे.

आज दुपारी प्रचंड दाबासह झालेल्या वादळामुळे



महावितरणच्या बडनेरा उपविभागातील यंत्रणा अस्त -व्यस्त झाली आहे. यात मुख्यत्वे २२० केव्ही कोंडेश्वर या अती उच्चदाब उपकेंद्रातून निघणारी आणि ३३ केव्ही अंजनगाव बारी उपकेंद्राला वीज पुरवठा करणाऱ्या ३३ केव्ही वाहिनीचे ५ पोल पडून वाहिनीचे नुकसान झाले . याचबरोबर ३३ केव्ही अंजनगाव बारी उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ केव्ही अडगाव,आणि ११ केव्ही अंजनगाव बारी या उच्चदाब वाहिनीचेही ७ पोल व वाहिनी जमिनदोस्त झाली आहे.

वादळाचा दबाव एवढा जास्त होता की, अनेक ठिकाणचे लोखंडी पोल वाकले आहे. अद्याप लघुदाब वाहिनीचे नुकसान किती झाले हे पाहण्याचे काम सुरू आहे. दरम्यान वीज यंत्रणा पुर्ववत करण्यासाठी कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे यांच्या मार्गदर्शनात महावितरणचे कर्मचारी, व्ही.आर. टेक आणि लक्ष्मी इलेक्ट्रीक्ल्स या दोन कंत्राटदार एजन्सिचे कर्मचारी नविन साहित्य सह फिल्डवर जावून दुरूस्ती कार्याला युध्दस्तरावर गती दिली आहे.

## दर्यापूर नगरपरिषद प्रभाग नंबर ३ मध्ये अतिक्रमण

प्रतिनिधी ९ मे

**दर्यापूर :** गुरेढोरे रस्त्यावर बांधण्याचा सुळसुळाट प्रभाग क्रमांक ३ मध्ये दर्यापूर मधून शिवसेना शिंदे गटाचे फक्त दोन उमेदवार निवडून आले त्यांनी या प्रभागामध्ये समस्या कडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

प्रभागांमध्ये बेकायदेशीर रित्या काही नागरिक गुरेढोरे मुख्यरस्त्यावर बांधतात तसेच नगरपालिका हद्दीत जागेवर अतिक्रमण करून पक्के टिनाचे शेड बांधले आहे.

नागरिकांना वाहनांना जाणे येण्यास त्रास सहन करावा लागत आहे वारंवार नागरिकांच्या नगरपालिका अधिकारी यांना तक्रारी दिल्या असून सुद्धा त्याचे निवारण होत नाही त्यामुळे येथील नागरिक त्रस्त झाले आहे.

प्रभाग क्रमांक ३ मध्ये नगरसेवक स्थानिक रहात नाही व येथील नागरिकांच्या समस्या येऊन बघत नाही त्यामुळे नागरिक प्रभागामध्ये गुरेढोरे मुख्य रस्त्यावर बांधतात.

त्यामुळे नागरिकांच्या तक्रारीवर भारतीय जनता पार्टीतर्फे अँड भूषण खंडारे सामाजिक कार्यकर्ता या नात्याने बेकायदेशीर कृत्य करणारे नागरिक यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाही होण्याबाबत निवेदन सादर करत आहे.

## चिखलदरा तालुक्यातील विकासकामांचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा


मडकी येथे पर्यटन विकासासह जलसंधारणावर भर



प्रतिनिधी ९ मे

**अमरावती:** जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी चिखलदरा तालुक्यातील विविध विकासकामांची प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी केली. नुकत्याच झालेल्या दौऱ्यादरम्यान त्यांनी सुरू असलेल्या कामांचा दर्जा तपासून सर्व कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले. मडकी (ता. चिखलदरा) येथे जिल्हा वार्षिक योजना आदिवासी उपाययोजना अंतर्गत सुरू असलेल्या सिमेंट नाला बांधकामाची पाहणी जिल्हाधिकारी . येरेकर यांनी केली. यावेळी त्यांनी जलजीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या विहीर व पाण्याच्या टाकीची तसेच अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनांची सविस्तर माहिती घेतली. मडकी येथील भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक सरपंच व ग्रामस्थांशी संवाद साधताना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. जलसंधारणाची कामे केवळ पाणी साठवण्यापुरती मर्यादित न ठेवता, त्यांचा उपयोग पर्यटन वाढीसाठी आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी करावा, जेणेकरून पर्यटकांना आकर्षित करून स्थानिक रोजगार वाढवता येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच यावेळी मौजे कोहाणा येथे मृद व जलसंधारण विभागामार्फत सुरू असलेल्या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याच्या कामाचीही पाहणी करण्यात आली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि. ९ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






## सिग्नल जोडले, अद्यापही नाही पडले, सुरू करण्याचे घोडे कुठे अडले...

# शहरातील सिग्नलचे पोल 'सडले'!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मागील सात वर्षापासून वाशीम शहरातील मुख्य चौकासह गर्दीच्या ठिकाणी वाशीम नगर पालिका प्रशासनाने सिग्नल चे काम करण्यासाठी श्री गणेशा केला होता. सिग्नलचे काम पुर्ण झाले सिग्नल लागलेही मात्र सिग्नल व्यवस्था अद्यापही सुरूच झाली नाही. त्यामुळे सिग्नल व्यवस्थेच्या कार्यप्रणालीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे सिटी न्युज सुरपफास्टने वृत्त मालिका चालविली. त्याची दखल प्रशासनाने घेत सिग्नलचे पोल व लाईट बसविले आहेत. या पोलवर गोल सिग्नलचे दिवे बंद असून सिग्नल जोडले असले तरी प्रत्यक्षात मात्र सिग्नल व्यवस्था सुरूच झाली नाही. नगर प्रशासन व ट्रॉफिक पोलिस प्रशासनाच्या नियोजनाअभावी सिग्नल व्यवस्था अद्यापही बंदच आहे. सात वर्षापासून दिखावा म्हणून भ्रष्टाचारासाठी उभे केले सिग्नलचे पोल सिग्नलचे दिवे न लागताच सडत आहेत. त्यामुळे सिग्नल व्यवस्थेत सुरू होण्यापूर्वीच बंद पडल्याने भ्रष्टाचार झाल्याचे सिध्द झाले आहे तरी सुध्दा भ्रष्टाचारी यंत्रणेवर कोणतीच कारवाई केली नाही.









वाशीम शहराची वाढती लोकसंख्या, तसेच शहरातील प्रमुख चौकामध्ये होणारी दररोजची वाहतुक कोंडी लक्षात घेवून नगरपालिका प्रशासनाने दोन वर्षापूर्वी वाशीम शहरातील प्रमुख चौकामध्ये वाहतूक नियंत्रण करण्यासाठी सिग्नल व्यवस्थेचा श्रीगणेशा केला होता. परंतु ही व्यवस्था अद्यापही शहरात सुरू झाली नसल्याने वाशीम शहरातील नेहमी गर्दीने फुलून जाणारे जुना रिसोड नाका, पाटणी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पुसद नाका, पोलिस स्टेशन चौक, पोस्ट ऑफीस चौक, अकोला नाका, हिंगोली नाका, रेल्वे गेट परिसरामध्ये दररोज वाहतुकीची कोंडी निर्माण होत आहे. वाशीम पालिका प्रशासनाने शहरामध्ये सिग्नल व्यवस्था सुरू करण्यासाठी ज्या कंत्राटदाराला या कामाचे कंत्राट दिलेले आहे. या सिग्नलच्या कामातच लाखो रूपयांचा भ्रष्टाचार झाला असून भ्रष्टाचारामुळेच सात वर्षापासून अद्यापही सिग्नल लागलेच नाही. सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्तानंतर ट्रॉफिक सिग्नलचे पोल व लाईट लावण्यात आले आहेत. शहरातील ट्रॉफीक व्यवस्था शहर वाहतुक शाखेकडे सुपूर्द करण्यात आली. ही सिग्नल व्यवस्था काही काळ वाहतुक सुरळीत करण्यासाठी वापरण्यात येते. सिग्नल सुविधा सुरू करण्यासाठी सिटी न्युज सुपरफास्टने वृत्त मालिका चालवून पाठपुरावा केला.

सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्तानंतर ट्रॉफिक सिग्नलचे पोल व लाईट लावण्यात आले आहेत. अद्यापही मात्र ते सिग्नल बंद असल्याने शोभेची वस्तु बनले आहे. त्यातील पोल जाग्यावरच सडत आहे.

### सिग्नलचे दिखावा दिवे ;मात्र व्यवस्था बंद

वाहतुक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी शहरात सिग्नलचे सुविधा करण्यात आली. मात्र या सुविधेसाठी लाखो रूपये खर्च करून शहर वासियांना काहीच उपायोग होत नाही. शहरात वाहतुक कोंडी होत असतांना दिखावा म्हणून सिग्नलचे दिवे लावले आहेत. मात्र ट्राफिक सुरळीत करणारी सिग्नल व्यवस्था बंद आहे. पोल सडत आहेत.

---

## थोडक्यात

### जिवती पंचायत समिती टीमची हराळ ग्रामपंचायतला भेट



● सिटी न्युज ब्युरो @ पिंप्री अवगण ●

परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व. मधुकरराव ल.सपकाळ महाविद्यालयाने यंदाही उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखत दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला शिक्षकांच्या मार्गदर्शनाची जोड मिळाल्याने विद्यालयाने उत्कृष्ट निकाल नोंदवत परिसरात मानाचा तुरा रोवला आहे.

यावर्षी बारावी विज्ञान शाखेचा निकाल तब्बल ९७ टक्के , तर कला शाखेचा १०० टक्के लागला आहे. तसेच दहावी परीक्षेचाही निकाल ८४ टक्के लागून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. दहावी परीक्षेत विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. त्यामध्ये – १) बाळू दत्ता डोंगरदिवे – ७९ टक्के २) कु. तन्वी उल्हास राठोड – ७८ टक्के ३) कु. साक्षी किशोर राठोड – ७७ टक्के ४) कु. मधुरा गजानन येवले – ७७ टक्के ५) कु. अक्षरा किशोर कांबळे – ७५ टक्के ६) कु. शितल गोपाल राठोड – ७५ टक्के ७) मंगेश दिनकर तायडे – ७५टक्के या सर्व आणि सोबतच यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सुशिल सपकाळ, प्राचार्य सुनिल सपकाळ व पदाधिकारी, शिक्षकवृंद व पालकांनी कौतुक करून अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या अथक, सातत्यपूर्ण परिश्रमामुळे व शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे तसेच परीक्षेपूर्वी विविध पेपरचा सराव आणि प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिल्यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांकडून व्यक्त करण्यात आली.

विद्यालय तसेच महाविद्यालयाच्या या उज्ज्वल यशामुळे संपूर्ण विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील काळातही अशीच यशस्वी परंपरा कायम राहील, असा विश्वास शिक्षक व कर्मचाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

---


# पाऊस अन् वादळी वारा, काही ठिकाणी गारा!

### जिल्ह्यातील तीव्र उकाडयांमुळे नागरिकांना दिलासा, शेतकरी मात्र चिंतेत

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात ठिकाठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी गाराही पडल्याची चर्चा आहे. काल रात्री झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस आल्याने रात्रभर विद्युत पुरवठा बंद पडला होता.

जिल्ह्यासह काही ग्रामीण भागात काल दि. ८ रोजी वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. दिवसभराच्या तीव्र उकाड्यानंतर अचानक बदललेल्या वातावरणामुळे नागरिकांना



दिलासा मिळाला असला, तरी या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

वाशीम जिल्ह्यातील रिसोड शहर आणि परिसरात दुपारनंतर अचानक ढग



दाटून आले आणि वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पावसाला सुरुवात झाली. उकाड्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला. मात्र, या वेळी झालेल्या पावसामुळे भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेषतः मिरची, टोमॅटो आणि इतर भाजीपाला पिकांना या पावसाचा फटका बसण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. अचानक बदललेल्या हवामानामुळे शेतीचे नियोजन विस्कळीत होण्याची शक्यता असून यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून उन्हाळी पीक पुर्णता: उध्दवस्त झाले आहे. त्यामुळे शेतीचा पंचनामा करून मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

---

# ज्ञान, तंत्रज्ञान, एकता आणि शाश्वत शेतीचा संगम

### कृषी विभागाचे आवाहन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या 'फार्मर ग्रुप लीग' स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील शेतकरी गटांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे. शेतकरी ग्रुप लीगच्या माध्यमातून शेतकरी एकत्र येऊन प्रगत तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती आणि डिजिटल शेतीचा वापर करण्याची संधी उपलब्ध होणार असून, त्यातून उत्पादनवाढीसह आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळणार आहे.

'ज्ञान, तंत्रज्ञान, एकता आणि शाश्वत शेती' हे ब्रीदवाक्य घेऊन सुरू करण्यात आलेली ही स्पर्धा वाशिम जिल्ह्यासाठी अभिमानास्पद पाऊल मानली जात आहे. या उपक्रमामुळे केवळ स्पर्धात्मक वातावरण निर्माण न होता, शेतकऱ्यांना एकमेकांच्या अनुभवातून शिकण्याची आणि आधुनिक शेती तंत्र आत्मसात करण्याची संधी मिळणार आहे.

स्पर्धेविषयी अधिक माहितीसाठी उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, वाशिम तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

---

# आगीत घनकचरा विलगीकरण केंद्रातील कचरा जळून खाक!


● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शहरातील डंम्पिंग ग्राऊंड स्थित घनकचरा विलगीकरण व प्रक्रिया केंद्र परिसरात ७ मे रोजी आग लागली होती. या आगीत वर्गीकृत सुका कचरा जळून खाक झाला. या आगीत अंदाजे ३६ लाख रुपयांचे नुकसानीचा अंदाज वर्तविण्यात आला. तर काही व्यक्तींनी जाणूनबुजून आग लावल्याची तक्रार ८ मे रोजी वाशिम शहर पोलिस ठाण्यात घनकचरा विलगीकरण व प्रक्रिया केंद्राकडून करण्यात आली आहे.

### ३६ लाखांचे नुकसान; मुद्दाम आग लावल्याची शहर पोलिसांत तक्रार







शहर पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, घनकचरा प्रकल्पात शहरातील कचऱ्याचे ओला व सुका असे वर्गीकरण करून प्रक्रिया केली जाते. मागील सहा महिन्यांपासून दररोज सुमारे दोन टन प्रमाणे वर्गीकृत सुका कचरा गोडाऊनबाहेरील सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवण्यात आला होता. त्याचे एकूण प्रमाण सुमारे ३६० टन इतके होते. ७ मे रोजी डम्पिंग ग्राउंड परिसरातील मिश्रित कचऱ्याला आग लागल्यानंतर मोठ्या प्रमाणात धूर निर्माण झाला.

त्यानंतर काही व्यक्तींनी चिथावणी देत वर्गीकृत सुक्या कचऱ्यालाही आग लावल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे पर्यावरण प्रदूषण, आरोग्याचा धोका आणि घनकचरा व्यवस्थेवर गंभीर परिणाम झाल्याचे नमूद करण्यात आले. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी या तक्रारीद्वारे करण्यात आली.

वाशीम नगर पालिकेच्या डम्पींग ग्राऊंडवरील कचऱ्यावर १० ते १२ वर्षात प्रक्रिया न झाल्याने कचऱ्याचे डोंगरा ऐवढे ढिगच्या ढिग साचले होते. दै. 'सिटी न्युज सुपरफास्ट'ने कचऱ्यावर प्रक्रिया न करता कोट्यवधी रूपयाचा कचरा खाल्याचे वृत्त मालिका पुराव्यासह प्रसिध्द करून या कचऱ्यातील कोट्यवधीच्या भ्रष्टाचाराला वाचा फोडली होती.




---



# समाधान शिबिरातून नागरिकांचे समाधान!

### *सहाही तालुक्यांत ६ हजार ६१० प्रकरणे निकाली * नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांनी विविध शासकीय योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा तसेच जणगणना २०२७ मध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. जिल्हाभर आयोजित करण्यात आलेल्या महसूल समाधान शिबिरांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सहाही तालुक्यांत एकूण ६ हजार ६१० प्रकरणांची नोंद करण्यात आली.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी वाशिम व रिसोड तालुक्यातील भेट दिली. यावेळी त्यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत जणगणना २०२७ ही राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाची प्रक्रिया असल्याचे





सांगितले. यावेळी त्यांनी सांगितले की, जणगणना २०२७ अंतर्गत १५ मे पर्यंत पहिल्या टप्प्यात स्वगणना प्रक्रिया सुरू झाली असून जास्तीत जास्त नागरिकांनी स्वगणना करावी. तसेच १६ मे ते १४ जून या कालावधीत घरगणना करण्यात येणार असून घरी येणाऱ्या प्रगणकांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे तसेच त्यांच्याशी सौजन्याने वागावे, असे आवाहनही त्यांनी केले. वाशिम येथील कार्यक्रमास विधानसभा सदस्य आमदार श्याम खोडे, विधान परिषद सदस्य आ. किरणराव सरनाईक, नगराध्यक्ष अनिल केंदळे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर व तहसीलदार निलेश पळसकर उपस्थित होते. कारंजा येथील कार्यक्रमास आ. सईताई डाहाके, उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, उपजिल्हाधिकारी संजय नागटिळक व तहसीलदार रवी महाले उपस्थित होते. मंगरूळपीर येथील कार्यक्रमास आ. श्याम खोडे, उपविभागीय अधिकारी रवी काळे, उपजिल्हाधिकारी वीरेंद्र जाधव व तहसीलदार सुधाकर अनासुने उपस्थित होते. मालेगाव येथील कार्यक्रमास अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील व तहसीलदार दीपक पुंडे उपस्थित होते; तर रिसोड येथील कार्यक्रमास जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर व मुख्याधिकारी सतीश शेवदा यांची प्रमुख उपस्थिती होती. श्याम खोडे यांनी महसूल शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना शासनाच्या सेवा गावपातळीवर उपलब्ध होत असून प्रशासनाने लोकाभिमुख कामकाजाला प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन केले. आ. सईताई डाहाके यांनी महसूल शिबिरांमुळे सामान्य नागरिकांची कामे जलद गतीने मार्गी लागत असून शासनाच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत असल्याचे सांगितले. आ.किरणराव सरनाईक यांनी महसूल प्रशासनाने राबविलेल्या उपक्रमांमुळे नागरिकांचा वेळ आणि खर्च वाचत असून अशा शिबिरांचे आयोजन नियमितपणे व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. या शिबिरांमुळे नागरिकांना विविध कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची गरज कमी झाली असून सेवा वितरण प्रक्रियेत गती व पारदर्शकता वाढल्याचे दिसून आले. जिल्हा प्रशासनाचा हा उपक्रम नागरिकांसाठी दिलासादायक ठरत असल्याची भावना लाभार्थ्यांकडून व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमास स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# महावितरणातील PD ग्राहकांसाठी विशेष अभय योजनेची मागणी

### तांत्रिक कामगार युनियनचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्र्यांना निवेदन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

तांत्रिक कामगार युनियनच्या वतीने मा. मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य यांना महावितरण कंपनीतील कायमस्वरूपी वीज खंडित (इअ) ग्राहकांसाठी 'विशेष अभय योजना' राबविण्याबाबत निवेदन देण्यात आली असल्याची माहिती केंद्रीय सरचिटणीस प्रभाकर लहाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात दिली आहे..

शासनाने ग्राहकहिताचा विचार करून याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी तांत्रिक कामगार युनियनचे केंद्रीय अध्यक्ष दिलीप कोरडे, कार्याध्यक्ष शिवाजी शिवनेचारी, उपाध्यक्ष बी आर पवार, गोपाल गाडगे, सतीश भुजबळ ,सरचिटणीस प्रभाकर लहाने, उपसरचिटणीस आनंद जगताप,




विलास डवर, विलास निमसटकर , केंद्रीय संघटक महेश हिवराळे, आर आर ठाकूर, अरुण यावले, मनोज मोरे, श्रीराम वाकचौरे , राज्य सचिव रघुनाथ तात्या लाड, प्रकाश निकम, संजय उगले , बाळासाहेब काटे, कोषाध्यक्ष गजानन अघम , नितीन चव्हाण, दत्तू भोईर, प्रसिद्धी प्रमुख अनिल सरोदे, महिला प्रतिनिधी शुभांगी मुचडे, विवेक बोरकर, किरण करहाळे, प्रकाश वाघ, विक्की कावळे, प्रदीप पाटील, युवा तांत्रिक कामगार संसद मुख्य समन्वयक देवेंद्र साळुंके , महिला विंग प्रमुख नीता काबरा, सचिव मनीषा औंदे , निलेश चक्रपाणी मंगेश चिमोटे यांनी केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शनिवार, दि. ९ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# मलकापूर तालुक्याचा निकाल ९२.५३ टक्के ; ७५३ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण !

## ◆ दोन शाळांचा निकाल शंभर टक्के, २,३५४ विद्यार्थी उत्तीर्ण

प्रतिनिधी ९ मे

**मलकापूर:** यंदाच्या दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत मलकापूर तालुक्याचा सरासरी निकाल ९२.५३ एवढा राहिला आहे. तालुक्यातील दोन शाळांचा निकाल शंभर टक्के लागला, तर २ हजार ५४४ पैकी एकूण २ हजार ३५४ विद्यार्थी वेगवेगळ्या श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत यंदाच्या वर्षी २ हजार ५५६ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज दाखल केले होते. त्यापैकी २ हजार ५४४ विद्यार्थी परीक्षेसाठी पात्र ठरले. ८ मे रोजी दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेचे निकाल जाहीर करण्यात आले आहे. त्यात मलकापूर तालुक्याचा सरासरी निकाल ९२.५३ एवढा राहिला आहे.दाताळा शिक्षण समिती विद्यालय २१.७२ टक्के, धरणगाव शिक्षण समिती विद्यालय २४.३०, लि. भो. चांडक विद्यालय ९७.८३, गो. वि. महाजन विद्यालय ८९.८३, म्युनिसिपल हायस्कूल ५०, झकेरिया उर्दू हायस्कूल ९४.३५ टक्के, हिराबाई संचेती कन्या शाळा ८४, नूतन विद्यालय मलकापूर ९७.११, यशवंत विद्यालय वडजी ७७.४१, विवेकानंद विद्यालय नरवेल ८७.०३, मोतीलाल संचेती विद्यालय देवधाबा ८६.१७ टक्के, जीवन विकास विद्यालय दुधलगाव बु. ९१.५८, जिल्हा परिषद हायस्कूल मलकापूर ८७.३० टक्के, वसंतराव लाहुडकर विद्यालय दसरखेड ८८.४६, ग्रामीण विकास विद्यालय बेलाड २६, भारत भारती कॉन्व्हेन्ट ८२.८५, उर्दू गर्ल्स हायस्कूल मलकापूर ९७.३१ टक्के, आदर्श विद्यालय जांबुळधाबा ८७.५० टक्के, आदर्श विद्यालय उमाळी ८०.७० टक्के, आबासाहेब देशमुख विद्यालय वडोदा २६.६६ टक्के, मौलाना आझाद उर्दू हायस्कूल १०० टक्के, नूतन विद्यालय निमखेड ६९.५६ टक्के, विद्या विकास विद्यालय वाकोडी १०० टक्के, अलीअलाना उर्दू हायस्कूल ९८.७० टक्के, लक्ष्मी विद्यालय म्हैसवाडी ९२.३० टक्के, आयडीएल इंग्लिश स्कूल जांबुळधाबा ९०.९० टक्के तर हरसोडा येथील स्व. वत्सलाबाई साहेबराव रायपूरे विद्यालयाचा निकाल २४.८२ टक्के लागला आहे.

# दे. राजात आईस्क्रीम पार्लरच्या फ्रिजचे कॉम्प्रेसर फुटून आग

## ५ दुकाने जळून खाक; लाखोंचे नुकसान

प्रतिनिधी ९ मे



**देऊळगाव राजा:** शहरातील संतोष चित्रमंदिर चौक परिसरात गुरुवार ८ मे रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागून ५ दुकाने जळून खाक झाली. आईस्क्रीम पार्लरमधील फ्रिजच्या कॉम्प्रेसरचा स्फोट झाल्याने ही आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले असून व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

प्रत्यक्षदर्शीनी दिलेल्या माहितीनुसार, आईस्क्रीम पार्लरमधील फ्रिजचा कॉम्प्रेसर अचानक फुटला आणि काही क्षणातच आगीने रौद्र रूप धारण केले. आग इतक्या वेगाने पसरली की शेजारील दुकानेही आगीच्या विळख्यात सापडली. यामध्ये दिलीप निमोनिया व आशिष

निमोनिया यांचे व्यंकटेश किराणा व महालक्ष्मी प्रोव्हीजन अशोक वाघ यांचे हेअर सलून, रमेश तिडके यांचे इलेक्ट्रीकल दुकान, आशिष कुदळे यांचे दुकान व इतरही दुकाने जळून खाक झाली.

आगीचे भीषण लोळ आणि धुराचे लोट परिसरात पसरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेहोते. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी तत्काळ नगरपालिका अग्निशामक दलाला फोन केला. अवघ्या ८ मिनिटांत अग्निशामक दल घटनास्थळी सकाळी नेमके १० वाजता फोन मिळताच नगरपालिका फायरमन भगवान मापारी यांनी तात्काळ अग्निशामक वाहनासह घटनास्थळी धाव घेतली. अवघ्या ७ते ८ मिनिटांत म्हणजेच १० वाजून ८ मिनिटांनी अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले आणि तातडीने पाण्याचा मारा सुरू करून आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम हाती घेतले.

भगवान मापारी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या तत्परतेमुळे आग अधिक पसरली नाही आणि मोठा अनर्थ टळला. अग्निशामक दलाला घटनास्थळी पोहोचण्यास उशीर झाला असता तर आजूबाजूच्या व्यापारी संकुलालाही आगीने वेढा घातला असता व मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. स्थानिक नागरिकांनीही विझवण्यासाठी मदत केली. मात्र आग तोपर्यंत दुकानांतील साहित्य जळून खाक झाले होते. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. वृत्त लिहिपर्यंत पंचमाना झालेला नव्हता. त्यावेळी कोणतीही उचित घटना घडू नये करिता जमाव पांगवण्याचे काम केले. तसेच सौ. माधुरीताई शिंपणे नगराध्यक्ष यांनी तात्काळ आगीच्या ठिकाणी परिस्थितीबाबत कळविले तसेच चिखली व जालना येथील अग्निशामक दलाला पाचारण केले होते. यावेळी मुख्याधिकारी अरुण मोकळ तहसीलदार वैशाली डोंगरजाळ, धनश्री राम शिंपणे, कविश जिंतुरकर, गणेश सवडे, पोलीस प्रशासनाचे पोलीस निरीक्षक ब्रह्मगिरी, सर्व पोलीस कर्मचारी नगरपालिकेचे सर्व नगरसेवक व कर्मचारी, उपस्थित होते.

# नांदुऱ्याचा निकाल ८९.३६ टक्के; २ हजार २०९ विद्यार्थी उत्तीर्ण!

प्रतिनिधी ९ मे

**नांदुरा:** दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, नांदुरा तालुक्याचा एकूण निकाल ८९.३६ टक्के लागला आहे. तालुक्यातून यंदा २ हजार ४७२ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २ हजार २०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

यंदाच्या निकालात ४४८ विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत, ६८४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ८०२ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर २७५ विद्यार्थी ग्रेडसह उत्तीर्ण झाले आहेत. तालुक्यातील विविध शाळांनी उल्लेखनीय कामगिरी नोंदविली असून, कोठारी इंग्लिश स्कूल, मो. उर्दू हायस्कूल चांदूर बिस्वा, जंगली बाबा हायस्कूल नांदुरा, हिंदुस्थान हायस्कूल नांदुरा, लिटल फ्लॉवर स्कूल वडनेर, मायाताई ठाकरे स्कूल नांदुरा तसेच केडी इंग्लिश स्कूल आणि अजित नॅशनल इंग्लिश स्कूल यांनी शंभर टक्के निकालाची नोंद केली आहे.नांदुऱ्यातील शिवाजी हायस्कूलचा निकाल ९४.३५ टक्के, कोठारी शाळा ७६.९६, कृषी विद्यालय शेंबा ८५, यशवंत हायस्कूल चांदूरबिस्वा ९१.७५, माध्यमिक विद्यालय जवळा बाजार ८१.१३, इनायतिया हायस्कूल नांदुरा ९६.६२, महात्मा फुले हायस्कूल निमगाव ७३.२३, गाडगेबाबा विद्यालय दहिगाव ८५.१३, कोठारी माध्यमिक शाळा ९३.३३, मोहता विद्यालय वडनेर भोलजी ९०.८२, भारतीय ज्ञानपीठ हायस्कूल नांदुरा ९३.२७, कळसकर विद्यालय निमगाव ८३.५४, बापूजी महाराज शाळा माळेगाव ८५.७१, इनायतीया उर्दू मुलींची शाळा नांदुरा ९२.९८, श्रीकृपा विद्यालय जिगाव ६१.७६, आदर्श विद्यालय शेलगाव मुकुंद ८२.५०, मजेदिया उर्दू स्कूल चांदुरबिस्वा ९८.६४, जय बजरंग हायस्कूल वडाळी ५६, एसकेके विद्यालय निमगाव ८१.३९, मजेतिया गर्ल्स हायस्कूल वडनेर २३.५२ टक्के निकाल लागला आहे.

# अल्पवयीन मुलीसोबत गैरवर्तनाचा प्रयत्न; गुन्हा दाखल

प्रतिनिधी ९ मे

**जळगाव जामोद:** तालुक्यातील एका गावात सात वर्षीय मुलीसोबत गैरवर्तनाचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी एका युवकाविरुद्ध पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारीवरून आरोपी प्रफुल अनिल सपकाळ याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५, ३५१ (२) तसेच पोक्सो कायद्यातील कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ७ मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास फिर्यादी यांची सात वर्षीय मुलगी शीतपेय आणण्यासाठी आरोपीच्या दुकानात गेली होती. त्यावेळी आरोपीने तिला घरात बोलावून तिच्याशी अयोग्य वर्तन करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.घाबरलेल्या अवस्थेत मुलगी घरी परतल्यानंतर तिने पालकांना घडलेला प्रकार सांगितला. यानंतर फिर्यादी यांनी आरोपीकडे जाब विचारला असता त्याने उडवाउडवीची उत्तरे देत धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक नितीनकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक स्नेहा शेडगे करीत आहेत.

# औषध विक्रेत्यांचा २० मे रोजी देशव्यापी बंद

प्रतिनिधी ९ मे

**खामगाव:** अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने (ँघ्ण्ण्ॅ) बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री तसेच कार्पोरेटद्वारे अव्यावसायिक स्पर्धेविरोधात २० मे २०२६ रोजी देशभरात औषध विक्रेत्यांचा बंद पुकारला आहे.

औषधी व्यवसाय हा ॅर्ङ्गे ँह् ण्देसूर्ग्मे ँ्रू १९४० व ँत्त १९४५ अंतर्गत चालवला जातो. ऑनलाईन औषध विक्रीबाबत ॅर्ङ्गेह् ण्देसूर्ग्मे ँ्रू मध्ये कोणतीही तरतुद नाही. केंद्र सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन औषध विक्रीबाबत उएँ ८१७ () २८ ऑगस्ट २०१८ अंतर्गत नोटिफिकेशन जारी केले होते. परंतु त्याचे अद्याप कायद्यात रुपांतर झालेले नसतानाही देशभरात सर्रासपणे बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री सुरु आहे. याबाबत मा. दिल्ली उच्च न्यायालयात रिट पिटिशन दाखल असून मा. दिल्ली उच्च न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीस स्थगितीमुध्दा दिलेली आहे. याकडे ही सरकार दुर्लक्ष करित आहे. संघटनेने सदरहू जीएसआर रद्द करण्याची मागणी केली आहे.

कोरोना काळात उएँ २२० () दि. २६.०३.२०२० काढून सरकारने औषधाची होम डिलिव्हरी देण्याबाबत विशेष सुअ ’दिली होती. कोरोना संपून पाचवर्ष उलटल्यानंतरही सदरहू नोटिफिकेशन वारंवार विनंती करुनही रद्द करण्यात आलेले नाही. याचा गैरफायदा घेऊन ऑनलाईन कंपन्या स्वतःचे भागभांडवल जाळून औषध विक्रीचा व्यवसाय करत आहेत.

तसेच कार्पोरेटद्वारे अव्यावसायिक स्पर्धा निर्माण केली जात आहे. ज्यामुळे अनेक छोटे व्यावसायिक अडचणीत येत असून ग्रामीण भागातीलऔषधी वितरण व्यवस्था धोक्यात येऊ शकते.

राज्य संघटनेचे जगन्नाथ शिंदे पुढे म्हणाले की, सरकारने ॅर्ङ्गु झ्ग्म ण्दहूदत् ध्ँ (अझ्ण्ध्) २०१३ या कायद्यानुसार ईैहर्ल्म्ली कडुन काही जीवनाश्यक औषधीवर ८ टक्के होलसेलरला व १६ टक्के रिटेलरला व अनियंत्रित औषधीवर

१० टक्के होलसेलर व २० टक्के रिटेलरला नफा देण्यात येतो. याउपर कार्पोरेट कंपन्या आपले भागभांडवल जाळून अव्यावसायिक

स्पर्धाकरित २० टक्के ते ५० टक्के डिस्काउंट देतात. यामुळे संपुर्ण देशातील १२.५० लाख औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात येऊन बंद होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे सरकारने ॅर्ङ्गु झ्ग्म ण्दहूदत् ध्ँ (अझ्ण्ध्) २०१३ अंतर्गत १६ टक्के एवढा नियंत्रित केलेला नफा याबाबतची तरतुद मागे घ्यावी. तसेच औषध विक्रेत्यास डॉक्टरने लिहिलेल्या औषधासारखी अनेक ँह् ँर्ङ्लू औषधी देण्याचा अधिकार दिल्यास औषध विक्रेतेही स्पर्धेला उत्तर देऊन सक्षमपणे कार्पोरेट कंपन्यासोबत लढा देऊ शकतील.

सरकारकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे संघटनेस आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागली व त्याअंतर्गत झालेल्या निर्णयानुसार २० मे २०२६ रोजी अखिल भारतीय औषध विक्रेत्यांचा बंद पुकारण्यात आला आहे. राज्यसंघटनेचे सचिव अनिल नावंदर यांनी सदरहू बंद महाराष्ट्र राज्यात १०० टक्के यशस्वी होईल. यासाठी संपूर्ण सभासद बंदच्या मानसिकतेत असल्याचे स्पष्ट केले. ते पुढे असेही म्हणाले की, लोकशाही मार्गात केलेल्या प्रयत्नांना सरकारकडून योग्य व सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे सभासदांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. जिल्हास्तरावर अशी माहिती गजानन शिंदे अध्यक्ष, बीडीसीडीए, वरामचंद्र आयलाणी, सचिव, बीडीसीडीए यांनी पत्रकाव्दारे दिली आहे.

# महाराजस्व शिबिराचा ३०० हून अधिक नागरिकांनी घेतला लाभ

प्रतिनिधी ९ मे



**सिंदखेड राजा:** नगर परिषदेच्या संत सावता भवनमध्ये ८ मे रोजी आयोजित ’छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर (टप्पा-१)’ आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी शिवकालीन प्रशासन आणि आजची शासकीय कर्तव्ये यांची सांगड घालत उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या लोकोपयोगी योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी ८ मे २०२६ रोजी सिंदखेड राजा येथे ’छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर (टप्पा-१)’ या शिबिरात तहसील कार्यालय, महसूल मंडळ आणि नगर परिषद सिंदखेड राजा यांच्या संयुक्त विद्यमाने शेकडो लाभार्थ्यांना शासकीय योजनांचे लाभ, प्रमाणपत्रे आणि साहित्याचे प्रत्यक्ष वाटप करण्यात आले.

शिबिरास उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, निवासी नायब तहसीलदार प्रांजल पवार, उपनगराध्यक्षा दिपालीताई म्हस्के, मुख्याधिकारी आशिष बोबडे गट विकास अधिकारी बांगर यांच्यासह सर्व महत्त्वाच्या खात्यांचे प्रमुख उपस्थित होते. प्रशासकीय अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध असल्याने नागरिकांच्या समस्यांचे तातडीने निराकरण झाले. यामध्ये ३९ घरकुल धारकांना मोफत रेती वाटप करण्यात आले. तसेच ४५ व्यक्तींना विविध दाखले व २० जणांना जन्म-मृत्यूदाखल्यांचे वाटप झाले. ’रमाई आवास योजने अंतर्गत २५ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी आदेश व शिफारस पत्रे देण्यात आली. कृषी विभाग अंतर्गत ८ ट्रॅक्टर आणि २ मळणी यंत्रांचे (थ्रेशर) वाटप करून शेतकऱ्यांना पाठबळ देण्यात आले. दुय्यम निबंधक कार्यालय तुकडेबंदी अंतर्गत ५ जणांना लाभ मिळाला, तर २ जणांना वाटणी पत्र नोंदणी फी सवलतीचा फायदा झाला. पंचायत समिती महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत २ महिला बचत गटांना कर्ज वाटप करण्यात आले. इतरः ६४ नागरिकांनी स्व-जनगणना प्रक्रियेत सहभाग नोंदवला. यावेळी उपनगराध्यक्ष सौ दिपाली योगेश म्हस्के मुख्याधिकारी आशिष बोबडे, सिंदखेड राजा नगरपरिषदेचे गटनेते अॅड. संदीप मेहेत्रे, गटविकास अधिकारी अभिजीत बांगर नायब तहसीलदार प्रांजल पवार तालुका कृषी अधिकारी रामेश्वर भुते, दुय्यम निबंधक संदीप देशमुख, भूमी अभिलेख उपअधीक्षक रचना जाधव, महिला व बालविकास अधिकारी जीवन राठोड, ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक विकास दराडे, मंडळ अधिकारी एस. एच. टेकाळे, ग्राम महसूल अधिकारी राहुल देशमुख, स्वप्निल देशमुख, महसूल सहाय्यक संजय सोनुने, संजय आटोळे, तालुका अध्यक्ष कृष्णा खरात, मधुकर उदार, संगीता निकस, जी. वाय. दराडे यांच्यासह महसूल व तहसील कर्मचारी उपस्थित होते.

# सोनाळ्यात पत्नीच्या डोक्यात दगड मारून केले जखमी; पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी ९ मे

**संग्रामपूर:** घरी येत नसल्याच्या कारणावरून पत्नीच्या डोक्यात दगड मारून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना सोनाळा येथे घडली. या प्रकरणी ६ मे रोजी सोनाळा पोलिसांनी पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वर्षा गणेश सोळंके (रा. सोनाळा) यांनी याबाबत तक्रार दिली. तक्रारीनुसार, नवरा-बायकोमध्ये किरकोळ वाद होत असल्याने सरस्वती प्रकाश शिंदे या त्यांच्या भावजयी वर्षा सोळंके यांच्या घरी राहत होत्या. दि. ३ मे रोजी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास वर्षा सोळंके आणि सरस्वती शिंदे या दोघी दवाखान्यात जात असताना घरासमोर सरस्वती यांचा पती प्रकाश शिंदे आला. त्याने सरस्वती यांना घरी चलण्यास सांगितले; मात्र त्यांनी नकार दिल्याने संतप्त झालेल्या प्रकाश शिंदे याने दगड उचलून त्यांच्या डोक्यात मारल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. यात सरस्वती या गंभीर जखमी झाल्या.दरम्यान, घटनास्थळी आलेल्या सासू शोभा शिंदे यांनी सरस्वती यांना मारहाण केली. त्यानंतर राजेश शिंदे व करण शिंदे हे दोघेही तेथे आले व धमकी देत अश्लील शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादी वर्षा सोळंके यांनी जखमी सरस्वती यांची आरोपींच्या तावडीतून सुटका करून पोलिस ठाणे गाठले. जखमी सरस्वती यांना प्रथम सोनाळा, त्यानंतर शेगाव व पुढील उपचारासाठी अकोल्याला हलविण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी सोनाळा पोलिसांनी प्रकाश राजेश शिंदे, शोभा राजेश शिंदे, राजेश विश्वनाथ शिंदे व करण राजेश शिंदे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# धुपेश्वर येथे प्रौढाची आत्महत्या!

## ◆ घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिस
## ◆ २४ तासांनंतर नदीकाठावर मृतदेह आढळला!


प्रतिनिधी ९मे

**मलकापूर:** श्री क्षेत्र धुपेश्वर येथील पूर्णा नदीच्या पुलावरून उडी घेऊन ४८ वर्षीय प्रौढाने आत्महत्या केल्याची घटना ७ मे रोजी घडली. या घटनेनंतर तब्बल २४ तासांनी संबंधित व्यक्तीचा मृतदेह ८ मे रोजी सकाळी नदीकाठावर आढळून आला. स्वप्नील मोहन कोलते (४८, रा. नरवेल, ता. मलकापूर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, कोलते हे ७मे रोजी सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास घरातून बाहेर पडले होते. त्यानंतर श्री क्षेत्र धुपेश्वर येथील पूर्णा नदीच्या पुलावरून त्यांनी सकाळी ७:३० वाजताच्या सुमारास नदीपात्रात उडी निरीक्षक नरेंद्र पेंदोर यांच्यासह पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. सुरुवातीला नेमके काय घडले, याबाबत संभ्रमाची स्थिती होती; मात्र, धुपेश्वर-कुन्हा पुलावर आढळून आलेली दुचाकी आणि अन्य माहितीच्या आधारे संबंधित व्यक्ती नरवेल येथील रहिवासी असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, तहसीलदार समाधान सोनवणे व महसूल विभागाचे पथकही घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर बचाव पथकाच्या मदतीने पूर्णा नदीपात्रात शोधमोहीम सुरू करण्यात आली. दिवसभर शोधकार्य सुरू असतानाही संबंधित व्यक्तीचा शोध लागला नाही. अखेर सूर्यास्तानंतर शोधमोहीम थांबविण्यात आली. दरम्यान, ८ मे रोजी सकाळी ७:३० वाजताच्या सुमारास घटनेनंतर तब्बल २४ तासांनी पूर्णा नदीच्या पुलानजीक नदीकाठावर मृतदेह आढळून आला.

# खासगी शाळांकडे विद्यार्थ्यांचा वाढता ओढा

## ◆ नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा करा; सेना- भाजपाचा हल्लाबोल



प्रतिनिधी ९ मे

**मलकापूर:** शहरातील हद्दीबाहेरील भागात टाकलेल्या अवैध पाणी पाईपलाईन तात्काळ बंद कराव्या. तसेच शहरवासीयांना नियमित व स्वच्छ पाणी पुरवठा करावा, यासाठी शुक्रवारी मलकापूर नगर परिषदेवर शिवसेना भाजपच्यावतीने हल्लाबोल करण्यात आला. शिवसेना शहरप्रमुख किशोर नवले व भाजप शहर पदाधिकारी यांच्या नेतृत्वात न. प. मुख्याधिकारी यांना धारेवर धरत तत्काळ उपाययोजना नगदकापुर कराव्या, अशी मागणी करण्यात आली. शहरवासियांना १० ते १२ दिवस पाणीपुरवठा होत नसून होणारा पाणीपुरवठा ही दूषित होत आहे. यातच एकीकडे नगर पालिकेला नियमित कर भरणाऱ्या नागरिकांना पाण्यापासून वंचित राहावे लागत असताना शहराच्या हद्दीबाहेर असणाऱ्या नागरिकांना मात्र न. प. च्या वतीने पाणीपुरवठा करण्यात येत असल्याने शिवसेना शहरप्रमुख किशोर नवले व भाजपाचे संतोष मुंबईकर यांच्या नेतृत्वात शिवसेना व भाजपाच्या पदाधिकारीव कार्यकर्त्यांच्यावतीने न.प. अधिकाऱ्यांचे विरोधात हल्लाबोल करण्यात आला. यावेळी शहरातील नागरिकांना तात्काळ नियमित्व स्वच्छपाणी पुरवठा करावा व न. प. हद्दीबाहेर टाकण्यात आलेल्या अवैध पाईपलाईन तत्काळ बंद करण्यात यावी, अशा मागणीची निवेदन न. प. मुख्याधिकारी यांना देण्यात आले.

# खामगावात दगडफेकप्रकरणी १६ जणांवर गुन्हा

## ◆ किरकोळ कारणावरून, उद्भवला वाद

प्रतिनिधी ९ मे

**खामगाव:** खामगाव शहरातील शिवाजीनगर पोलिस ठाणे हद्दीतील निर्मल टर्निंग परिसरात क्रिकेट खेळणे व दुचाकीचा हॉर्न वाजविल्या मुळे दोन गटांत वाद होऊन दगड फेकीची घटना ७ मे रोजी रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत एकजण जखमी झाला असून, पोलिसांनी १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, निर्मल टर्निंग परिसरातील काही तरुण रस्त्यावर क्रिकेट खेळत होते. त्याचवेळी लखन ऊर्फ शशांक पडोळे हे दुचाकीने जात असताना हॉर्न वाजवल्याच्या कारणावरून त्यांच्यात वाद निर्माण झाला. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी शीघ्र कृती दलालाही पाचारण करण्यात आले. या प्रकरणी सहायक पोलिस उपनिरीक्षक सुनील बोरसे यांनी फिर्याद दिली. फिर्यादीत नमूद आरोपींमध्ये सैय्यद वसीम ऊर्फ गब्बर सैय्यद कासम, राजू खान, अप्पू ऊर्फ हाफीज पठाण (रा. जुनाफैल), सोनू ऊर्फ शेख आफताब शेख रफिक, सुलतान खान, शेख इटी ऊर्फ इटीदादा शेख अयुब, शेख नदीम ऊर्फ कालू शेख अलीम, शेख वक्कू रहमोद्दीन (रा. लोहार गल्ली, जुनाफैल), सोहेल शहा रफिक शहा (रा. अब्दुल हमीद चौक), सैयद मोहसीन सैयद कासम यांच्यासह सूरज ससे (रा. नवाफैल), विश्वंभर मनाळ, गणेश वानखडे, नाना चिखले, अश्विन खंडागळे (रा. शिवाजीनगर), दीपक करपे (रा. सतीफैल) यांचा समावेश आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शनिवार, दि. ९ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्हा मध्यवर्ती बँकेत आता भूमिपुत्रांना प्राधान्य

प्रतिनिधी ९ मे

**♦ बँक भरतीत डोमिसाईल धारक उमेदवारांसाठी ७० टक्के जागा राखीव**



**अकोला :** राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील पदांसाठी भरती करताना, आता ७०३ जागा रहिवासी प्रमाणपत्र धारक अर्थात डोमिसाइल आणि जिल्ह्याचे मूळ रहिवासी असलेल्या उमेदवारांसाठी राखीव असतील. उर्वरित ३०३ जागा जिल्ह्याबाहेरील उमेदवारांसाठी खुल्या असतील. जिल्ह्याबाहेरून पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास, राखीव जागा जिल्ह्याबाहेरील उमेदवारांकडून भरल्या जाऊ शकतात.

राज्याच्या सहकारी विभागाने या संदर्भात एक शासकीय आदेश जारी केला आहे. हा शासकीय निर्णय राज्यातील ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून भरतीसाठी प्रसिद्ध होणाऱ्या नवीन जाहिरातींना तात्काळ प्रभावाने लागू होईल. सध्या राज्यात ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कार्यरत आहेत. सरकारच्या या निर्णयाने जिल्ह्यातील भूमिपुत्रांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये लिपिक कारकून आणि वरिष्ठ पदांसाठी वेळोवेळी भरती प्रक्रिया राबवली जाते जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या प्रामुख्याने शेतकरी आणि ग्रामीण विकास संस्थांची जोडलेल्या आहेत या बँकांचे कार्यक्षेत्र आणि सभासद हे त्या जिल्ह्यापुरते मर्यादित असतात स्थानिक बोलीभाषा भौगोलिक परिस्थिती आणि ग्रामीण प्रश्नांची जाण असलेले कर्मचारी मिळाल्यास बँकांच्या ग्राहकांना आणि सभासदांना अधिक दर्जेदार सेवा देता येईल या उद्देशाने सरकारने हा बदल केला असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे जिल्हा मध्यवर्ती बँका या विकास संस्थांच्या मातृसंस्था म्हणून ओळखल्या जातात गाव पातळीवरील विकास संस्थांचे अस्तित्व या बँकांवर अवलंबून असते स्थानिक तरुणांची भरती झाल्यामुळे बँकेचा कारभार अधिक लोकाभिमुख होईल आणि शेतकऱ्यांना कर्जपुरवठा तसेच अन्य सुविधा मिळताना येणाऱ्या भाषेच्या किंवा ओळखीच्या अडचणी दूर होण्यास मदत होईल

# केव्हा होणार शहरातील शेकडो चिकन विक्रेत्यांचे सर्वेक्षण

प्रतिनिधी ९ मे

**♦ बर्ड फ्लूचा धोका: महानगरपालिका केव्हा होईल सतर्क**



**अकोला :** राज्यातील नंदुरबार जिल्ह्यामधील नवापूरमध्ये बर्ड फ्लूची मोठी लाट आहे. गेल्या काही दिवसांपासून तेथे परिस्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. राज्यातील अन्य जिल्ह्यात ही स्थिती असल्याने अकोला महापालिका प्रशासनाने हायअलर्ट राहणे गरजेचे आहे. शहरात ५० ते ६० अधिकृत तर शेकडो अनधिकृत चिकन विक्रेते आहेत. बर्ड फ्लूच्या संभाव्य धोक्यामुळे या सर्व चिकन विक्रेत्यांचे तातडीने सर्वेक्षण करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. शहरातील काही चिकन विक्रेत्यांकडे नंदुरबार येथून चिकनची आवक होते. त्यामुळे शहरात बर्ड फ्ल्यू चा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही, या पार्श्वभूमीवर शहरातील अधिकृत आणि अनधिकृत अशा सर्व चिकन विक्रेत्यांच्या सर्वेक्षणाचे आदेश महापालिका प्रशासनाने त्वरित दिले पाहिजेत. याशिवाय संबंधित विभागांना सतर्क राहण्याचे आदेश सुद्धा देणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभाग, अन्न व औषध प्रशासन विभागाने सुद्धा एखादी मोहीम राबवून बर्ड फ्लू बाधित चिकन विकणाऱ्या चिकन विक्रेत्यांवर कडक कार्यवाही करावी अशी मागणी होत आहे

# शिवशाही बस सेवा होणार बंद



प्रतिनिधी ९ मे

**अकोला :** महाराष्ट्र परिवहन विभागाने शिवशाही बस सेवा टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात २,००० शिवशाही बसेस होत्या. यापैकी २०० बसेस सेवेतून काढून टाकण्यात आल्या आहेत. या बसेस नियमित लाल बस म्हणून चालवल्या जातील. शिवशाही बसेसमध्ये आवश्यक बदल केले जातील. परिवहन विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने याला दुजोरा दिला. गेल्या काही महिन्यांपासून शिवशाही बसेसबाबत प्रवाशांच्या तक्रारी येत होत्या. प्रवाशांच्या तक्रारींचा विचार करून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी हा निर्णय घेतला. बसेसमध्ये केले जाणारे बदल: शिवशाही बसमधील एसी प्रणाली आणि आसने बदलली जातील. यानंतर, या नियमित लाल बसेस सेवेत समाविष्ट केल्या जातील. सूत्रांनुसार, आतापर्यंत अंदाजे २०० शिवशाही बसेस नियमित बसेसमध्ये रूपांतरित करण्यात आल्या आहेत. परिवहन विभागाचा दावा आहे की, यामुळे महामंडळाचा देखभाल खर्च कमी होईल आणि ग्रामीण भागात अधिक एसटी लाल बसेस उपलब्ध होतील.

# बेपत्ता डॉक्टर तरुणाचा गुन्हे शाखेने लावला शोध, नातेवाईकांनी मानले पोलिसांचे आभार

प्रतिनिधी ९ मे



**अकोला :** १ मे पासून बेपत्ता डॉक्टर युवकाचा शोध लावण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश मिळाले. त्याला नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले.

०१-०५-२०२६ रोजी फिर्यादी दिगंबर अवधूत राउत यांनी त्यांचा मुलगा नामे अभिषेक राउत हा कोणालाही काही न सांगता निघून गेले बाबत रिपोर्ट दिला होता वरून पोलीस स्टेशन रामदास पेठ येथे मिसिंगची नोंद घेतली. एसपी अर्चित चांडक यांनी दखल घेऊन गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांना निर्देशित केले होते त्यानुसार तातडीने तपासाची चक्रे फिरविण्यात आली. तपासा दरम्यान पोलिसांनी अभिषेकच्या मित्र-मैत्रिणींकडे सखोल चौकशी केली. ०४ मे रोजी मिसिंग मुलाचे वडील, मावस भाऊ, आतेभाऊ व वाडेगाव येथील नागरिकांनी स्था गु शा कार्यालय येथे येऊन पोनि शंकर शेळके पीएसआय बोडखे यांची भेट घेऊन ०२ तास चर्चा केली. त्यावेळी केलेल्या तांत्रिक विश्लेषनाची माहिती नातेवाईक यांना देऊन, मुलगा कोठे असू शकतो याची माहिती दिली. दिनांक ०६.०५.२०२६ रोजी मुलगा सुखरूप बीड जिल्ह्यातून नातेवाईकांच्या ताब्यात मिळाला. त्या पूर्वी मुलाने आपला मोबाईल फोन स्विच ऑफ करून दुचाकीने शेगाव, नाशिक असे देवस्थाने फिरून शेवटी प्रेयसीकडे गेल्याचे समजले. तेव्हा नातेवाईकांनी सुखरूप ताब्यात घेतले. ०७-०५-२०२६ रोजी हरविलेल्या मुलासह नातेवाईकांनी स्थानिक गुन्हे शाखा येथे येऊन अकोला पोलीस अधीक्षक श्री अर्चित चांडक तसेच पोलीस निरीक्षक शंकर शेळके, ज्ग बोडखे यांचे नातेवाईकांनी आणि मित्र परिवारांनी आभार व्यक्त केले.

# एमआयडीसी पोलिसांनी आरोपीला दोन तासात केली अटक

प्रतिनिधी ९ मे

**अकोला :** विक्रमकुमार दुबे रा. बिसनपुर होरील बिहार हे ०८ मे रोजी दुपारी येवता टी पॉईट येथे असता एका अनोळखी मुलाने मोटार सायकलने लेबेन कंपनीकडे सोडून देतो म्हणून गाडीवर बसविले. काही अंतरावर आरोपीने चाकू दाखवुन फिर्यादीचे खिश्यातील १३,०००/- रु. चा मोबाईल जबरदस्तीने हिसकावुन नेला. सदर गुन्हयातील आरोपी मंगेश उत्तमराव वावगे रा. महात्मा फुले नगर, नवसारी अमरावती ह. मु. कैलास नगर, कुंभारी, अकोला व एक विधी संघर्षग्रस्त बालक रा. कैलास नगर, कुंभारी, अकोला यांचा शोध घेवुन आरोपी मंगेश वावगेला अटक केली. आरोपी कडुन २,३२,५००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# रिधोरा नजीक अपघातात एक ठार, एक गंभीर जखमी

प्रतिनिधी ९ मे

**♦ मृतक वाशिम जिल्ह्यातील मालेगावचा**



**अकोला :** अकोला राष्ट्रीय महामार्गावरील रिधोरा गावानजीक झालेल्या कारच्या भीषण अपघातात एक जण ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना ८ मे रोजी रात्री ९ वाजेदरम्यान हॉटेल मामा भांजेसमोर घडली.

पोलीस सूत्रांकडुन प्राप्त माहितीनुसार एम.एच.३७जी, ६९३९ क्रमाकांची कार अकोल्याकडून मालेगावकडे येत असताना रिधोरा गावानजीकच्या हॉटेल मामा भांजे समोर रस्त्यावर उलटलेल्या अवस्थेत आढळून आली. या गाडीत मूळचा कुरळा येथील रहिवासी असलेला अक्षय विजयराव घुगे (३४) (रा. सध्या मालेगाव) हा घटना स्थळीच ठार झाला. तर त्याचा मित्र संदेश संजय लाहोटी (३२) रा. मालेगाव हा गंभीर जखमी झाला. दोघेही मालेगाव तालुक्यातील प्रसिद्ध शासकीय कंत्राटदार असून ते ८ मे रोजी कामानिमित्त अकोला येथे गेले होते. अकोल्यावरून घराकडे परत येत असताना सदरहू अपघात घडला. या अपघातात कारच्या पुढील भागाचा मोठ्या प्रमाणात चुराडा झाल्याने भरधाव कार समोरील वाहनांवर आदळल्याने हा अपघात झाल्याचा कयास पोलिसांसह घटनास्थळावरील व्यक्तीकडून व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक इंगळे, हेड कॉन्स्टेबल मनीष राठोड यांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातातील जखमींना व मृतकाला वाहनाने रुग्णालयात हलविले. त्यानंतर रस्त्यावरील अपघातग्रस्त कार बाजूला हटवून वाहतुक सुरळीत केली. अक्षय घुगे यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, पत्नी असा मोठा परिवार असून त्याच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.




# मुस्लिम असल्याच्या आधारावर दावा नाकारता येणार नाही – मुंबई उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

प्रतिनिधी ९ मे

**♦ जावेद झकारिया यांनी केले स्वागत**

**अकोला :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका महत्त्वपूर्ण निर्णयात स्पष्ट केले आहे की, एखादी व्यक्ती मुस्लिम धर्माचे पालन करते म्हणून तिची जातीय ओळख संपुष्टात येत नाही. जुन्या शासकीय नोंदी आणि कागदपत्रांमधून जात सिद्ध होत असेल, तर केवळ 'Affinity Test' किंवा धार्मिक ओळखीच्या आधारावर जात दावा फेटाळता येणार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. हा महत्त्वपूर्ण निर्णय नागपूर येथील मोहम्मद लुकमान परेख यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक १८७३/२०२६ मध्ये न्यायमूर्ती श्रीमती एम. एस. जवालकर आणि न्यायमूर्ती नंदेश एस. देशपांडे यांच्या खंडपीठाने दिला. न्यायालयाने जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, वाशिम यांचा आदेश रद्द करत याचिकाकर्त्याला 'काची' इतर मागासवर्गीय (OBC) जात वैधता प्रमाणपत्र देण्याचे निर्देश दिले.न्यायालयासमोर १९५१ चा जन्म दाखला, जुने शालेय अभिलेख तसेच १९५९ मधील विक्रीपत्र (Sale Deed) यांसारखी ऐतिहासिक कागदपत्रे सादर करण्यात आली होती. या सर्व दस्तावेजांमध्ये कुटुंबाची जात 'कच्छी' अशी नमूद करण्यात आली होती. न्यायालयाने नमूद केले की, भक्कम दस्तावेजी पुरावे उपलब्ध असताना केवळ धर्म किंवा सामाजिक ओळखीच्या आधारावर जात दावा नाकारता येत नाही.खंडपीठाने सर्वोच्च न्यायालयाच्या २०२३ मधील 'महाराष्ट्र आदिवासी ठाकूर जमात स्वारक्षण समिती विरुद्ध महाराष्ट्र राज्य' या निर्णयाचाही उल्लेख करत सांगितले की, केवळ 'Affinity Test' च्या आधारे जात दावा फेटाळणे योग्य नाही.हायकोर्टाने संबंधित समितीला चार आठवड्यांच्या आत 'काची' ध्ँ जात वैधता प्रमाणपत्र जारी करण्याचे आदेश दिले आहेत.या निर्णयावर प्रतिक्रिया देताना यांनी बॉम्बे हायकोर्ट आणि महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, सत्याचा विजय झाला असून अनेक वर्षांपासून कच्छी समाजातील लोकांना जात वैधता प्रमाणपत्र देताना अनावश्यक त्रास दिला जात होता. महाराष्ट्र शासनाने १२-१२-२०२३ च्या उें मधून भूमिका स्पष्ट केली असतानाही केवळ मुस्लिम असल्यामुळे अर्ज फेटाळले जात होते. अखेर हायकोर्टाने हक्क आणि संविधानाच्या बाजूने ऐतिहासिक निर्णय दिला.

# किसान काँग्रेस शेतकऱ्यांचा आवाज होऊन लढणार!

प्रतिनिधी ९ मे

**♦ सरकारने शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करायचे ठरवले आहे का?**




**मूर्तिजापूर :** किसान काँग्रेस अकोला जिल्ह्याच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत राज्य आणि केंद्र सरकारच्या कृषी धोरणांवर जोरदार टीका करण्यात आली. खरीप हंगाम तोंडावर आला असताना बी-बियाणे, खते, कीटकनाशके तसेच इतर कृषी निविष्ठांच्या किंमती मोठ्या प्रमाणावर बाढल्या असून शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे किसान काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना शेतमालाला हमीभाव मिळत नसल्याने शेती व्यवसाय तोट्यात गेला असल्याची भूमिका पत्रकार परिषदेत मांडण्यात आली.

पत्रकार परिषदेत बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, डीएपी, एनपीके, सूक्ष्म अन्नद्रव्ये तसेच विविध पिकांच्या बियाण्यांच्या किंमतींमध्ये गेल्या काही वर्षांत मोठी वाढ झाली आहे. कृषी निविष्ठांच्या वाढत्या दरामुळे हेक्टरी उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला असून त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर झाला आहे. अनेक भागांत खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याच्या तक्रारी असून शेतकऱ्यांना जादा दराने खतें खरेदी करावी लागत असल्याचेही त्यांनी नमूद केले. सरकारकडे नियंत्रण यंत्रणा असूनही बाजारातील परिस्थितीवर प्रभावी नियंत्रण दिसत नसल्याचा आरोप करण्यात आला. यावर्षी संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारची तयारी अपुरी असल्याची टीकाही किसान काँग्रेसने केली. राज्यातील अनेक भागांत पाणीसाठा कमी झाला असून भूजल पातळी घसरली आहे. अशा परिस्थितीत जलसंधारण, नाला खोलीकरण, शेततळी, चारा उपलब्धता आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन यावर सरकारने तातडीने काम करणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात कोणतीही ठोस यंत्रणा कार्यरत दिसत नसल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. दुष्काळ हा केवळ नैसर्गिक प्रश्न नसून नियोजनाच्या अभावाचेही प्रतीक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. आंतरराष्ट्रीय ट्रेड डील आणि आयात-निर्यात धोरणांमुळे भारतीय शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचा गंभीर मुद्दाही पत्रकार परिषदेत मांडण्यात आला. परदेशातून स्वस्त कृषी माल आयात झाल्याने स्थानिक बाजारपेठेतील दर कोसळत असून भारतीय शेतमाल स्पर्धेत टिकू शकत नसल्याचे किसान काँग्रेसने म्हटले आहे. उत्पादन खर्च वाढलेला असताना बाजारभाव कमी राहिल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत असल्याचे त्यांनी सांगितले. कृषी क्षेत्राला संरक्षण देण्याऐवजी सरकार मोठ्या व्यापारी हितसंबंधांना प्राधान्य देत असल्याची टीका करण्यात आली. कर्जमाफी आणि पीककर्ज वितरणाच्या मुद्यावरही सरकारवर निशाणा साधण्यात आला. कर्जमाफीची नुसती घोषणा करण्यात आली आहे परंतु अद्याप राज्यातील एकाही शेतकऱ्याला कर्जमाफीचा लाभ मिळालेला नाही आणि जोपर्यंत कर्जमाफी नाही तोपर्यंत नवीन कर्ज मिळणार नाही. येत्या हंगामामध्ये शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी मध्ये वाढ होणार पर्यायाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढू शकतात. या पुढील काळात होणाऱ्या सर्व आत्महत्या या सरकारने ठरवून शांत डोक्याने आणि थंड रक्ताने केलेल्या हत्या असेल. सरकारने शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र आर्थिक पॅकेज जाहीर करून संपूर्ण कर्जमाफी, व्याजमाफी आणि तातडीने पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. पत्रकार परिषदेला अकोला जिल्हा किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवी पाटील अरबट, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव अक्षय राऊत, तालुका अध्यक्ष राजू जोगदंड, शहर अध्यक्ष सोहेल शेख, युवक काँग्रेस चे शहर अध्यक्ष नितीन गायकवाड, अनंत पांडे, उज्वल महल्ले, प्रशांत कडू, ऱ्एळघ चे प्रथमेश इंगळे तसेच शेतकरी नेते प्रशांत गावंडे व अनेक काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते. अकोला जिल्हा किसान कॉंग्रेसने जाहीर केले कि संपूर्ण महाराष्ट्रात एकतरी कर्जमाफीचा शेतकरी लाभार्थी दाखविल्यास सरकारला बक्षीस देण्यात येईल.

# दहावीत कमी गुण मिळाल्याने विद्यार्थ्यांची आत्महत्या

प्रतिनिधी ९ मे



**अकोला :** शिंगोली येथील विठ्ठल संतोष बोर्डे (वय १६ वर्ष) हा विद्यार्थी शेगाव येथे दहावी शिकत होता. आज जाहीर झालेल्या निकालात त्याला दहावीत ७० टक्के गुण प्राप्त झाले होते. परंतु ७० टक्के इतके गुण हे त्याला कमी पडले, असे त्याला वाटले. याच निराशेतून त्याने आज ८ मे रोजी दुपारी कारंजा रमजानपुर येथील धरणात उडी घेऊन आत्महत्या केली.

जय दिलीप बोर्डे यांनी उरळ पोलीस स्टेशनला या प्रकरणी तक्रार दिली. त्यावरून उरळ पोलीस स्टेशनचे ठाणेदार पंकज कांबळे, जमादार सोळंके, नेमाडे , खान, गुरु, बचे यांनी त्वरित घटनास्थळी भेट दिली. गावातील लोकांच्या मदतीने ठाणेदार यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचे प्रेत धरणातून बाहेर काढण्यात आले. या घटनेने शिंगोली गावात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK